डिजीटल आवृत्ती

मासिक

# शिक्षण यात्री

▪ वर्ष:५ वे ▪ अंक: ५ वा ▪ जून २०२० ▪ किंमत:४० रूपये



# कोरोना, गाडीन तुला ...

कुणी येता अंगावर, घेतो शिंगावर
हेच बाळकडू आहे मला
कोरोना, पाताळात गाडीन तुला ।।धृ।।

नादी कुणाच्या लागतोस अन
भीती कोणाला दाखवतोस
टक्कर घेतोस काताळाशी
याचीही अक्कल नाही तुला
कोरोना, तू ओळखले का मला ।।१।।

घर ही नाही, घाट ही नाही
हरामाचं खातोस, कुठे तू राहतोस
पण तू मायावी, आहेस पाशवी
असुरी विद्या तुझी, आहे फसवी
नालायका, कुठे ही शिकलास कला ।।२।।

शोधी माझाच कधी अणू-रेणू
तर कधी हायड्रोजन परमाणू
अस्तित्व नसलेला तू क्षुद्र विषाणू
जिवाणू, बळे कुणाच्या माजतोस
अवकात तुझी, कधी कळली नाही तुला ।।३।।

महासागर ओंजळीत भरतो मी
एका क्षणात आकाश चिरतो मी
थरकाप राहू केतूचा करतो मी
नजरेने सूर्याला जरब भरतो मी
महामानव म्हणतात मला ।।४।।



- डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से)

**वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक**

▸ वर्ष : ५ वे

▸ अंक:५वा ▸ जून २०२०

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

**• मानद संपादक •**

**सुभाषदादा कुलकर्णी**

**• कार्य.संपादक •**

**संदेश नंदकिशोर हजारे**

**• संपादन सहाय्य •**

**प्रा.डॉ.माधव कदम**

**युवराज माने**

**• प्रतिनिधी सहाय्य •**

**पुणे-** रमेश काळे, **मुंबई-** जयपाल गिरासे, **नाशिक-**किरण पाटील, **सोलापूर-** उमेश काळे, **औरंगाबाद-** रवि गारूडकर, **परभणी-** युवराज माने, **जळगांव-** प्रविण माळी, **नंदुरबार-** तुकाराम धनगर, **अमरावती-** रूपेश माने, **कोल्हापूर** - गुलाब बिसेन,**सातारा** - विनोद भोजने,

**• मुखपृष्ठ •**

**साभार आंतरजाल (लोकसत्ता) ...**

**• अंक मांडणी •**

**प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे**

- लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
- पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
- सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत

# अंतरंग...

३ शिक्षणाची गाडी रूळावर आणण्यासाठी...
५ ज्ञानार्जनाचे सूत्र...
७ टोपण नांव...
१० इथ पासून ...इतिपर्यंत !
१२ अश्रूंची झाली फुले...
१५ सागरी ऊर्जा...
१६ गुरूजींवर प्रेम करणारी मुलं
२० इकिडना...
१९ सेकंदात पाढे...
२४ माझी कविता...

**मासिका विषयी ...**

जून २०२०

नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226

वर्गणी : वार्षिक ₹ ५००, द्विवार्षिक ₹ १०००, त्रैवार्षिक १५००,

संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.

चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

संवादकीय

# पुनश्च हरिओम पण सबुरीनं !

दोन अडीच महिन्याचा अभूतपुर्व घरबंदीचा काळ. फारच कठीण. घरात बसून राहणे एक प्रकारची तपश्चर्याचा म्हणावी लागेल. पण या काळात शाळा, शिक्षण, विद्यार्थी यांचं भविष्य अधांतरीच लटकलेलं दिसतंच होतं आणि अद्यापही हे लटकलेलंपण दूर झालेलं नाही.

मार्चच्या शेवटचा आठवडा. शैक्षणिक सत्र संपणार होतं आणि त्यात कोरोनाची धडक बसली. त्या धडकेतून सावरणे अजुनही कठीण झालेय. सर्वच क्षेत्र, उदयोग, सेवा यांना फटका बसलाय. या फटक्यातून उदयोगधंदे सावरतील मात्र शिक्षणाचे काय करायचे शाळा कशा सुरु करायच्या यात गोंधळ आहेच. शासन सर्वतोपरी मार्ग काढून शैक्षणिक सत्र सुरु करायचं म्हणतयं तर पालक-शिक्षण तज्ञ-शिक्षक कोरोना संसर्गाच्या भितीने सबुरीनं घ्या असा विचार मांडताहेत.

शाळा सुरु केल्यानं कोरोना संसर्ग वाढणार यात शंकाच नाही. कारण मुलं आली तिथं सोशल डिस्टन्स, सॅनिटराईज, सहा फुटाचे अंतर याला मर्यादा येतीलच. शिक्षक किती किती प्रयत्न करेल? कुठे नि कसा लक्ष देईल? हे अवघडच आहे. ग्रामीण भागात संसर्ग पोहचलाय. अहो, शाळांमध्ये किरकोळ गालफुगी जरी आले, त्या मुलांना दोन तीन दिवस घरीच राहु दिले जाते. त्याच्यामुळे इतरांना संसर्ग होईल या भितीने मुले-पालकही काळजी घेतात. आतातर कोरोनाचे भूत पक्के मानगुटीवर बसलेले. पालकवर्ग मुलांना शाळेत पाठवतील हे आतातरी शक्य दिसत नाही.

मग या कोरानाने शैक्षणिक वर्षच वाया जाईल असाही एक वाद आहे. म्हणूनच शासनाने ऑनलाईनच्या माध्यमातून शिक्षणाचा पुनश्च हरिओम करायचे ठरवलेच. काही मार्गदर्शक तत्व यातून दिली आहेत. टप्प्याने शाळा उघडायच्या, दोन सत्रात शाळा, एक दिवसाआड शिक्षण असे विविध मार्ग सांगितलेत. लहानवर्ग सोडून ऑनलाईनचा रस्ताही दाखवलाय. पण या ऑनलाईनचा मर्यादा आहेत. हे साऱ्यांना कळून चुकलेय. मोबाईलपासून दूर रहायला सांगणारे आता मुलांच्या हाती मोबाईल, टॅब देताहेत.

या साऱ्यापेक्षा थोडं थांबायला काय हरकत आहे? कोरोनाचा संसर्गाचा जोर थोडा ओसरला की करु यात शाळा सुरु. मुले घरी नुसती बसून आहेत असं नाही. तर ते काही ना करत आहेत. हस्तकौशल्याने शिकताय, गाडी विमान बनवताय, बैठे खेळातून शिकताहेत. घरी पालकवर्ग थोडा अभ्यास करुन घेताहेत. मुलांची चंचलता त्यांना खुप काही शिकवतेय. फक्त शैक्षणिक अभ्यासात तो मागे पडेल इतकीच भिती आहे ना, ते ही शिक्षक वर्ग मार्ग काढून दूर करतील ना! थोडा अभ्यासक्रम कमी करुन, सत्राचा समारोप करता येईल. मोफत पाठ्यपुस्तके घरोघरी मुलांना वाटप केली तर मुले नवीन पुस्तकांचा परिचय स्वत:च करतील, पालक ,मोठे भाऊ -बहीण त्यांना मार्गदर्शन करतील यातूनही मुलांचा अभ्यास होणार.

परंतु केवळ अट्टहासाने ऑनलाईन शिक्षण किंवा शाळा उघडण्याची घाई करायला नको. पुनश्च हरिओम नक्कीच करायचाय परंतु थोडं सबुरीनं घ्यायला काहीच हरकत नाही.

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.

सामोरे जातांना...



**विजय पांढरीपांडे**
हैदराबाद
७६५९०८४५५५

# शिक्षणाची गाडी रुळावर आणण्यासाठी...

सद्यपरिस्थितीत आपत्कालीन घटनांना सामोरे जातांना आपल्याला अनेक बदलांचा सामना करावा लागेल. नवे बदल स्वीकारावे लागतील. विशेष करुन शिक्षण क्षेत्रात ह्या आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जातांना विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तात्कालीन स्वरुपाचे अन् दीर्घकालीन स्वरुपाचे काय निर्णय घेता येतील ह्याचा विचार प्रस्तुत लेखात करायचा आहे.

आधी तत्कालीन उपाय योजनांचा विचार करु. हा विचार दोन स्तरांवर करावा लागेल. एक शालेय शिक्षण अन् दुसरे महाविद्यालयीन म्हणजे विद्यापीठ स्तरावरील शिक्षण. त्यापैकी गेल्या शैक्षणिक सत्रातील राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करणे अन् नवे शैक्षणिक सत्र सुरु करणे ह्या तीन महत्वाच्या बाबी असतील. अनेक शाळातून राहिलेल्या अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रशिक्षण सुरु झाले आहे. अर्थात पारंपारिक वर्गातून मिळणाऱ्या शिक्षणाची, अभ्यासाची सवय झालेल्या विद्यार्थ्यांना हे शिकवणे कितपत पचेल, रुचेल हा प्रश्नच आहे. जास्तीत जास्त ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना ही नवी पध्दत, हे नवे तंत्रज्ञान कितपत आत्मसात करता येईल हा प्रश्न आहे. ह्या बदलाला तयार नसलेल्या शिक्षकांपुढे देखील नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिकवतांना अनेक अडचणी येऊ शकतात. इंटरनेटची उपलब्धता, नवी पध्दत समजून घेण्यात शिक्षकांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी ह्याचाही विचार करावा लागेल. गेले काही दिवस मी शहरातल्या, इंजिनियरिंग कॉलेजच्या प्राध्यापकांच्या संपर्कात आहे. ते सुध्दा ह्या बदलांना सामोरे जायला सर्व दृष्टीने सिध्द नाहीत. वेल इक्विप्ड् नाहीत. प्रशिक्षण नाहीत. मग ग्रामीण भागातील आर्टस् सायंन्सच्या फॅकल्टीतील प्राध्यापकांनी गोष्टच वेगळी.

ह्या परिस्थितीत स्वयं अध्ययनावर भर देणे उत्तम झालेल्या अभ्यासक्रमांच्या तुलनेत राहिलेला अभ्यासक्रम थोडाच असणार. कारण कोरोना संकट मार्चच्या मध्यावधीत सुरु झाले. त्यामुळे ह्या उरलेल्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:हून अभ्यास करणे उत्तम त्यासाठी पालकांची मदत घेता येईल. शेजार पाजारच्या हुशार विद्यार्थ्यांची मदत घेता येईल. (शारीरिक अंतर, मास्क वगैरेचे नियम पाळून) ह्या अभ्यासक्रमावर आधारित गृहपाठ विद्यार्थ्यांनी सबमिट करावा. म्हणजे ते नेमके काय शिकले, त्यांच उद्देश काय, कुठे कसा उपयोग काय ह्यावर आधारीत टिपण लिहावे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आकलन, स्पष्टीकरण, प्रगटीकरण तपासता येईल.

आता परीक्षेचा प्रश्न, गुण, ग्रेडस् देण्याचा प्रश्न.. आपली शालेय म्हणा किंवा महाविद्यालयीन म्हणा, एकुणच परीक्षापध्दत चुकीची आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांचे उचित मुल्यमापन होतेच असा दावा करता येणार नाही. विद्यापीठाचे प्रशासन तर परीक्षा विभागाकरीता, मुल्यमापन करता लाखो नव्हे करोडो रुपये खर्च करते. ह्याशिवाय कित्येक मनुष्य तास खर्च होतात ते वेगळेच. एवढेच सगळे खर्ची घालून जे गुण प्रदान केले जातात, ज्या ग्रेडस् दिल्या जातात. त्या तथाकथित विद्यार्थ्यांच्या बुध्दीमत्तेचे, आकलन शक्तीचे तंतोतंत्र प्रतीक असतात का? ह्याचे उत्तर निसंदिग्धपणे नाही असे आहे. विद्यार्थ्यांचे मार्कस्, ग्रेडस्, रँक्स अन् त्याची बुध्दीमत्ता,

क्षमता, उपयोगिता त्याचा अर्थाअर्थी संबंध नसतो हे मी अनुभवाने, ठामपणे सांगू शकतो. आपले प्रश्नपत्र, आपली परीक्षा पध्दत, मुल्यांकन पध्दत, प्राध्यापकांचा पेपर तपासण्यातला, परीक्षा घेण्यातून एकुणच कॅज्युअल अप्रोच, विद्यार्थ्यांची मनोवृत्ती (टयुशन वर भर, प्रायव्हेट क्लासेस ने माजवलेला गोंधळ) हे सारे त्यासाठी कारणीभूत आहे. त्यामुळे विद्यार्थीची एक वर्ष जर परीक्षाच घेतली नाही किंवा जे मुल्यमापन झाले. त्यावर अवलंबून राहिले तर फारसे काही बिघडणार नाही. अर्थात जे विद्यार्थी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तरच्या अंतीम वर्णाला आहेत. त्यांच्यापुरते तात्पुरते काही एक धोरण ठरवावे लागेल.

आयआयटी,एन आयटी सारख्या स्वायत्त संस्था ह्यांची विद्यार्थी संख्या त्या मानाने मर्यादीत असल्याने, शिकवणारे शिक्षकच मुल्यमापन करीत असल्याने फारशी समस्या येणार नाही. पण विद्यापीठाच्या अधीन असलेली संलग्नित महाविद्यालये, त्यातील लाखो विद्यार्थी ह्यांचा खरा प्रश्न आहे. कारण आपल्या सिस्टीममध्ये अशा कॉलेजसच्या बाबतीत विश्वासार्हता शुन्य असल्याने, परीक्षा, मुल्यमान हे केंद्रीभूत असते. विद्यापीठ स्तरावरच होते. दहावी/बारावीच्या बोर्डाच्या बाबतीत देखील अशीच समस्या असते. जोपर्यंत शिक्षणाचे, मुल्यमापणाचे विकेंद्रीकरण होत नाही. आपल्या सिस्टिममध्ये विश्वासर्हता वाढत नाही तोपर्यंत ही समस्या तशीच राहणार. विद्यापीठाची संलग्न असणाऱ्या शेकडो कॉलेजेसचा, लाखो विद्यार्थ्यांचा प्रश्न खरेच गंभीर आहे.

थोडक्यात शैक्षणिक सत्र रुळावर आणण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करता येतील. २०१९-२० चे राहिलेले सत्र ऑनलाईन शिकवणी अन् स्वयंअध्ययन, होमवर्क या पध्दतीने पूर्ण करावे. शेवटचा वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांचा परीक्षा शक्यतो ऑनलाईन पध्दतीने, मोजक्या अभ्यासक्रमावरच घ्यावा. बाकीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या ऑलरेडी झालेल्या क्लासटेस्टस्, असाईनमेंटस्, प्रोजेक्ट वर्क ह्या आधारे सरासरी गुण देऊन प्रमोशन वर्क ह्या आधारे सरासरी गुण देऊन प्रमोशन द्यावे.

पुढील २०२० -२ ह्या सदरासाठी वेगळे कॉम्पॅक्ट कॅलेंडर तयार करावे. प्रत्येक वेळी सगळे काही वर्गातच शिकविले पाहिजे हा अट्टहास सोडावा लागेल. मुलांना जास्तीत जास्त गृहपाठ द्यावेत. स्वत: वाचायला, अभ्यासायला प्रवृत्त करावे. जे वाचले, अभ्यासले, त्यावर आधारीत टिपणे काढायला जे आत्मसात केले ते स्वत:च्या शब्दात एक्सप्रेस करायला बाध्य करावे. त्यावर मुल्यमापन करावे.

विज्ञान/तंत्रज्ञान/ फार्मसी अशा अनेक अभ्यास क्रमाला प्रयोग शाळेतील प्रात्यक्षिके महत्वाची असतात. त्यासाठी ९ ते ४, १० ते ५ अशा ठराविक वेळेची सवय बदलावी लागेल. प्रयोगशाळा चोवीस तास उघडया ठेवाव्या लागतील. त्यासाठी कर्मचारी/ प्राध्यापक आळीपाळीने येतील. आपल्याला कार्यालयीन वेळाची संकल्पनाच बदलावी लागले. काही वर्ग संध्याकाळी/रात्री घ्यावे लागतील. कंटिन्युअस असे समेंटचा पर्याय स्वीकारावा लागेल. तोंडी प्रश्न, प्रात्यक्षिके, प्रकल्प ह्या वेगवेगळ्या संकल्पनांद्वारे मुल्यमापन करावे लागेल. हे मुल्यमापन पारदर्शी अन् योग्य व्हावे ह्यासाठी ते एकछत्री न ठेवता. सामुदायिक पध्दतीने करता येईल. हे सगळे योग्य तऱ्हेने अंमलात आणण्यासाठी प्रशासन, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक यांच्यात सामंजस्याचे, विश्वासाचे वातावरण निर्माण करावे लागेल. सद्य परिस्थितीचे आगळे वेगळे गंभीर स्वरुप ध्यानात घेता उपाययोजना देखील नाविन्यपूर्ण, अभूतपूर्व अशाच असतील.एकूण न भुतो न भविष्यती अशा बदलालांना सामोरे जायला आपणा सर्वांना तयार व्हावे लागेल.

विनोबा विचार



**नीला आपटे**
विनोबा आश्रम,गागोदे
९४०५९२४२२७.

# ज्ञानार्जनाचे सूत्र...

एका भाषाविषयक संशोधनात शिक्षकांच्या धारणा समजून घेताना असे लक्षात आले. की ९० टक्क्यांहून अधिक शिक्षकांना असे वाटते, की मुलांना अक्षरांची ओळख करुन द्यावी लागते आणि वरच्या वर्गामध्ये अक्षरांनी बनलेल्या शब्दांच्या, वाक्यांच्या अर्थाचे आकलन शिकवावे लागते. ही धारणा शिक्षकांच्या मनात इतकी पक्की आहे, की आपल्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गात मुलांना फक्त मुळाक्षर क्रमवार गिरवून, घोकून, शिकवली जातात. त्यामुळे अक्षरे ही अर्थपूर्ण भाषेचा घटक आहे. हे कधी लहान मुलांच्या लक्षातच येत नाही. लेखन-वाचन शिकवण्याची ही पध्दत अत्यंत चुकीची आहे, हे आता लक्षात येत आहे. कारण, या पध्दतीने शिकवल्यामुळे पाचवी-सहावीच्या वर्गातही अनेक मुले अशी सापडतात, ज्यांना साधा अक्षरपरिचयही झालेला नाही. यामागचं एक महत्वाचं कारण असं की मुलांना लेखन, वाचनाची गरज काय आहे, हे कळण्याअगोदरच अक्षरांचे लेखन, वाचन शिकवलं जातं. लिहायला, वाचायला शिकायचं कशासाठी? अ आ इ ए किंवा क ख ग घ शिकून मी पुढे काय करायचं? असा प्रश्न तीन-चार वर्षे वयापासूनच अक्षरे गिरवू लागणाऱ्या प्रत्येक बालकाच्या मनात येत असावा, असं मला नेहमी वाटतं. कारण, जेव्हा शिकलेल्या ज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनात किंवा आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी उपाययोजना होते. तेव्हाच हे ज्ञान अर्थपूर्ण होते.

माणसाने काय शिकावे, हे कसे ठरवावे, यासाठी विनोबांनी एक सूत्र सांगितले आहे. जशा गरजा तसेच शिक्षण हे ते सूत्र. विनोबा म्हणतात, ज्या ज्ञानाची गरज निर्माण होईल ते ज्ञान मिळविण्याची शक्ती त्याला मिळवून द्यावी, गरजा लक्षात घेऊन शिक्षण द्यायचे म्हणजे अर्थातच शिक्षण जगण्याशी जोडून घ्यायचे. जेव्हा गरज निर्माण होते, तेव्हा मुले कमी वेळेत आणि जास्त चांगल्या पध्दतीने शिकतात. अगदी घरचे अनौपचारिक शिक्षणाचे उदाहरण घ्यायचे झाले तर, मुलांची आई कामानिमित्त बाहेरगावी जात असेल किंवा इतर कोणत्या कारणाने मुलांना एकटे राहण्याची वेळ येत असेल, तर स्वयंपाक करायला ती लवकर शिकतात. कारण, ती त्याची गरज बनलेली असते. आदिवासी भागातील सात-आठ वर्षाची मुलेदेखील चूल पेटवून डाळ-भात बनवताना मी पाहिली आहेत. याउलट, ज्या मुलांना बसल्याजागी सगळं हातात पडते, ती मुले प्रौढ होईपर्यंत साधा चहादेखील स्वत:च्या हाताने बनवायला शिकत नाहीत, कारण त्याची गरज त्यांना कधी भासलेली नसते.

मुलांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीवरुन त्यांच्या गरजा निश्चित होतात, हे तर वास्तवच आहे. असे असतांना गरजांप्रमाणे शिक्षण द्यायचे तर औपचारिक शिक्षणातून अनेक गोष्टी बाजूला पडतील का? अशीही भिती वाटणं साहजिक आहे. कधी कधी मुलांच्या सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या गरजांमधील तफावत कमी करण्यासाठी, शिक्षण देताना गरज मुद्दाम निर्माण करावी लागते. कधी कधी गरज जरी निर्माण नाही. करता आली, तरी त्या गोष्टीचे उपयोजन दैनंदिन जीवनात कसे होणार आहे, याचे प्रात्याक्षिक देणेही पुरेसे ठरते. भाषेचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास, आपण जे काही बोलत असतो,

तेच कागदावर उमटवणे(म्हणजे लेखन) दुसऱ्याने जे काही लेखनाद्वारे व्यक्त कले आहे, ते समजून घेणे (म्हणजेच वाचन), लेखी निरोप देणे-घेणे, वेगवेगळ्या याद्या बनविणे, जे बोलले जाते, ते लिहून काढणे आणि लिहिलेले आहे ते वाचून समजून घेणे, दोन मुलांनी काही संवाद करणे व तोच संवाद लेखी स्वरुपात मांडणे, अशा सर्व अनुभवांतून आपण मुलांपर्यत लेखन वाचनाचे महत्व आहे, लेखन वाचनाचे दैनंदिन जीवनात काय प्रयोजन आहे, याची कशी गरज आहे, ते पोहोचवू शकतो. ज्या गोष्टीची गरज वाटते, ती गोष्ट आत्मसात करण्याची ऊर्मी खरं तर जन्मताच असते. आज आपण अनेक पालक मुलांचे मोबाईल, टीव्ही, कॉम्प्युटर किंवा तत्सम यंत्रे सहजपणे हाताळतांना दिसतात. ह्या सर्व गोष्टी आधुनिक जीवनाच्या गरजा बदललेल्या आहेत. त्याविषयीचे ज्ञान मुले सहजपणे आत्मसात करतात.

गरज ही शोधाची जननी आहे असे म्हटले जाते. मानवाला आपल्या भावना विचार व्यक्त करण्याची अथवा आपण मिळवलेले ज्ञान पुढील पिढ्यांसाठी साठवून ठेवण्याची गरज भासली, त्यावेळेस लिपीचा शोध लागला. मानवाला सृष्टीतील विविध गोष्टीविषयी कुतूहल निर्माण झाले व ते कुतहल शमविण्याची गरज वाटू लागली तेव्हा मानवाने अनेक वैज्ञानिक शोध लावले. मानवी समाजाचा उगम व विकास कसा झाला याविषयी कुतूहल निर्माण झाले, तेव्हा मानवी इतिहासाचा माणसाने अभ्यास केला आणि मानववंश शास्त्र निर्माण झाले. गुंतागुंतीचे हिशोब ठेवण्याची अथवा मोठी आकडेमोड करण्याची गरज वाटली. त्यावेळेला गणिती क्रियांचा शोध लागला व गणित शास्त्र विकसित झाले. माणसाने कुतूहलापोटी, म्हणजे बौध्दिक व भावनिक गरज भागवण्यासाठी ज्या काही ज्ञानशाखा निर्माण व विकसित केल्या, त्याच ज्ञानशाखांविषयी कुतूहल निर्माण झाले, की ते कुतूहल शमविण्याची गरज निर्माण होईल व ती गरज पुर्ण करण्यासाठी जे प्रयत्न होतील त्यातूनच शिक्षण होईल. असा हा सारा गरज निर्माण करण्यापासून ती शमविण्यापर्यतचा प्रवास आहे, हेच शिक्षण आहे. माणूस किंवा सर्वच प्राणी हे तहान लागली की पाणी पितात, भूक लागली की अन्न खातात, त्याचप्रमाणे जेव्हा माणसाला तहान लागते, गरज वाटते, तेव्हाच माणून ज्ञानग्रहण करण्याचा कसोशीने प्रयत्न करतो. अर्थातच यामुळे विनोबांनी सांगितलेले जशी गरज तसे शिक्षण हे ज्ञानार्जनाचे सूत्र किती सत्य व समर्पक आहे, हे आपल्या लक्षात येते.

## निवेदन...

कोरोनाच्या जागतिक संकटात टाळेबंदीच्या प्रयोगाने सारेच ठप्प झाले. त्याचा फटका प्रकाशन उद्योगालाही बसला आणि त्याच कारणाने शिक्षणयात्री मासिकाच्या एप्रिल-मे-२०२० अंक प्रकाशित करू शकलो नाही. याबद्दल दिलगीर आहोत.

तरी वाचकांच्या सोयीसाठी जुन-२०२० हा अंक डिजीटल स्वरूपात प्रकाशित करित आहोत. ३० जून नंतर टपाल खाते सुरू होणार अशी आशा असल्याने जुलै २०२० पासून मासिकांचा छापील अंक नियमितपणे आपल्या पत्त्यावर पाठवण्याचा प्रयत्न असेन. अर्थात जुलै महिन्याची परिस्थिती पाहून छापील अंकाबाबत निर्णय होईल अन्यथा डिजीटल अंक आपल्याला देण्याचा प्रयत्न राहील. म्हणूनच वर्गणीदारांनी आपले व्हॉटसअप क्रमांक किंवा ई-मेल कळवण्याची नम्र विनंती.

संपर्क - 9850964601/8208301001 email : shikshanyatri11@mail.com

आठवणीतलं बालपण...



**आबा गोविंदा महाजन**
तहसिलदार/बालसाहित्यीक
शिरपूर जि.धुळे

# टोपण नांव...

ही गोष्ट आहे माझ्या नावाची. लहानपणीची. मी पहिल्या इयत्तेत होतो तेव्हाची. गोष्ट आहे अशी...

एक आहे गाव. गावाचं नाव एरंडोल. त्यात आहे गल्ली. गल्लीचं नाव नागोबा मढी. संत ज्ञानेश्वर मंदिराजवळ. गल्लीत राहायचो मी. मी आबा. संपूर्ण नाव आबा गोविंदा महाजन. तुम्ही म्हणाल, आबा हे तर टोपणनाव. तुमचं म्हणणं अर्ध खरं. अर्ध खोटं, कारण हे काही माझं टोपण नाही. व्याकरणाच्या भाषेत सांगायचं म्हटलं तर आबा हेच माझं विशेषनाम. शाळा सोडण्याच्या दाखल्यावरसुध्दा तेच नांव. शाळेतल्या नमुना नंबर एकवर सुध्दा तेच. अन् फाईलीतल्या चिपकून बसलेल्या ढीगभर प्रमाणपत्रांवरसुध्दा तेच. एवढाच काय, सेवापुस्तकावर सुध्दा तेच नाव. आबा. घरीपण मला संमदे आबा म्हणायचे. आईवडील, आत्या, भाऊ-बहिण, मित्रमंडळी, नातेवाईक, सर्वच लग्नानंतर माझी सौ.मला साहेब तर ऑफिसमधले रावसाहेब एवढाच काय तो अपवाद.

मित्राशी कसल्यातरी कारणांवरुन भांडण वगैरे व्हायचं. भांडणात विजय त्यांचाच व्हायचा, कारण की, त्यांच्याकडं एक नामी युक्ती असायची. ते मला चिडवायचे. आबा डबा म्हणायचे. कुणी कुणी तर आबामा डबा. डबा मा कैरी. अन आबानी बायको बयरी असं म्हणायचे. अन् पळून जायचे. मग मी हाती जे सापडेल... काठी, दगड, फुटपट्टी ते घेऊन त्यांच्यामागे धावायचो. एका मुलाला तर मी भयंकर संतापात दगड हाणला. त्याचा डोळा फुटता फुटता वाचला, सरळ कपाळावर जाऊन भिडला. कपाळ टराटरा फुगून मोठ्ठं बेंड आलं. त्याच्या मोठया भावाला समजलं. दोन दिवसांनी त्यानं बदला काढला. पिंपळाच्या झाडाआड उभा राहून, मलाही एक दगड जोरात मारुन फेकला. कपाळ वाचलं. पण माझं डोकं फुटलं. खूप रक्तबिक्त सांडलं. माझ्या नावावरुन एक-दोन असेच हाणामारीचे प्रसंग. तुर्त ते जाऊ द्या. ते सांगेल कधीतरी...

... तर सांगायचा मुद्दा हा की, मला माझ्या या नावाचा खूप राग यायचा. इतका राग यायचा, की मी नावावरुन डायरेक घरच्यांशी भांडायचो. हे काय नाव असतं? काय तर म्हणे, आबा... माझ्या जन्माच्या वेळी काय नावांचा दुष्काळ पडला होता? तेव्हा एकदिवशी माझ्या आत्यानं मला सांगितलं, की तुझं खरं नाव आबा नसून राकेश आहे. मी उडालोच. राकेश व्वा, किती गोड नाव. ऐकायला सोप्पं. बोलयला छान लिहायला मस्त.

कहाणी थोडी लंबीलचक आहे. तरीही मी सांगणारच...

... तर झालं असं, की मी सहा-सात वर्षाचा झालो होतो. बालवाडीत मी कधी पाय ठेवला नाही. गल्लीतल्या मढीत बालवाडी भरायची. मी खिडकीला लटकून खिडकीतूनच गाणी, गोष्टी ऐकायचो. बाई शिकवायला लागल्या, की मी खिडकी सोडून पसार.

इतरांसारखंच माझंही नाव पहिल्या वर्गात दाखल झालं. बसस्टॅन्डजवळ शाळा होती. म्हणजे तशी घरापस्नं लांबच. शाळा खाजगी संस्थेची. दुसरं म्हणजे शाळेचा रस्ता वर्दळीचा. मी त्यात एवढासा जीव. गल्ली सोडून कधी एकटा-दुकटा बाहेर न गेलेला शाळेत जाताना मोटारगाडया, ट्रक, टेम्पो पाहून भेदरायचे घाम सुटायचा. गाडी अंगावर येईल की काय? अशी भीती मनात.

घरातले सर्वच शेतात. मग मी त्यावर एक शक्कल

लढवली. शाळेचं नाव करुन मी बसस्टॅण्डवर बसून राहायचो. एसटीची गंमत पाहायचो. कोणती एसटी आली. गेली कोण उतरलं. म्हतारे किती? तरुण किती? मुलं किती? बाया किती? मोजत बसायचो. कंटाळा आला तर मित्रांसोबत गोटया गोटया खेळायचो नाहीतर लपाछपी, शाळेला दांडी, तिकडे सर हजेरीसाठी नाव पुकारायचे, राकेश गोविंदा महाजन, गैरहजर मी इकडं बसस्टॅन्डवर.

काही दिवसांनी ही बातमी घरी पोहोचली. गोटया गोटया खेळताना जो मुलगा सर्व गोट्या हरला होता. त्यानं रागात येऊन माझ्या गैरहजेरीची इत्यंभूत माहिती घरी पोहचवली. मला बेदम मार. त्याच्या गोटया वसूल.

माझी एक आत्या निपाणे-बामणेला राहते. लहानी आत्या. निपाण्याची आत्या अशी तिची ओळख. ती दहा-पंधरा दिवसांनी आमच्याकडं येत-जात असायची. ती आली की मला जीव लावायची. माया करायची. भल्या पहाटे-पहाटे उठवायची. चुल्ह्यावर कडक पाणी तापवायची. एक दगडी फेणा घ्यायची माझं अंग घास-घास घासायची. बटलुईवर बटलुई पाणी ओतायची. सावळी सावळी माझी कोवळी कातडी पार लाल लाल करुन सोडायची. मग एक-दोन दिवसतरी माझी कातडी नुसती आग मारायची, पण त्याचा फायदाबी व्हायचा. मी थोडा थोडा गोरामोरा दिसू लागायचो.

बूट नाहीतर स्लीपर आणून द्यायची. नागेपाय फिरु नये. अभ्यास करावा. चांगली संगत धरावी. खरं बोलावं. खोटं बोलू नये. घरातील कामं करावीत. जेवायला बसल्यावर सगळयासाठी ताटं आणावीत. उष्ट पाडू नये. अशा लाख गोष्टी सांगायची. उपदेश-बिपदेश करायची. मी मान डोलवायचो . गुल्फी खायला पैसे द्यायची. गोड शेव आणायची. आत्या आली म्हणजे माझी चंगळच.

...तर मुख्य गोष्ट अशी. मी शाळेत जात नाही असं कळल्यावर आत्या भडकली. माझ्यावर रागावली. घरच्यांवर संतापली. पोरग्यानं नाव इतला दूरना शायमा टाकी ठेवं, मोटारगाडीना रस्ता. काई करता काई व्हयी गयंत? घरात जोरजोरात बोलू लागली. मग तिनं खुंटीवर लटकलेली माझी पाटी-दप्तरची पिशी उचलली. संतापात माझा हात गच्च पकडला. अन् एखाद्या ढोराला जसं ओढावं तसं ओढू लागली. मराठी शाळेचा रस्ता धरला. ती पुढं ताणत होती. मी जोर लावून एकाच जागी उभा. जमिनीवर बसायला करु लागलो. तेव्हा तिनं एक बारीकशी लांब काठी घेतली. सपासप दोनचार वेळा पायावर ठेवून दिली. मग ती पुढं. मी मागे रडणं सुरुच तिला रहेम येईना.

आजूबाजूला तमाशा बघणाऱ्यांची गर्दी. खरं म्हणजे माझं त्या शाळेत चित्त काही लागेना. त्यात सर एकदम कडक. उठता बसता छडी मारणारे. शिवाय शाळेत एकाच जागेवर तासन्तास बसून राहणं. किती अवघड. मी सरांना घाबरायचो. कारण माझ्या देखत त्यांनी एका गोटया नावाच्या पोराला खूप हाणला होता. का तर. त्याला एकाचा अंक काढता येईना. सरांनी त्याला दोनदा-तीनदा शिकवला. त्याचं बोट पकडून एकाचा आकार फळ्यावर फिरविला. पाटीवर गिरवला. तरीही हा पठ्ठया एकाचा आकडा उलटाच काढायचा. मग काय त्याच हातावर छडीचा प्रसाद. मी गुपचूप दप्तरासकट बसस्टँन्डवर... आत्यानं मला ओढत-ताणत, फरफरटक शाळा गाठली. शाळा सरकारी जिल्हापरिषदेची, मराठी शाळा, कौलारु-कौलारु, माझं रडणं बंद नव्हतंच. चालूत. डोळे डबडबलेले. आसवं गळत होती. तिला पर्वा नव्हती. सगळीच मुलं माझ्याकडं पाहू लागली. माझा तो अवतार. मग मी थोडा नरमलो शरमलो. रडणं बंद. आसवं उजव्या बाहीनं पुसून टाकली. शाळेत अनेक मुलं ओळखीची दिसत होती. नागोबा मढीजवळची. मारोती मंदिराजवळची पांढरीतली. अशी अनेक.

माझ्या आत्याला पाहून भारंबे गुरुजी आले. आमचे शेजारी होते ते. आत्याला ओळखत होते. त्यांनी मला एका कोपऱ्यातल्या वर्गात बसवलं. रोज इथंच बसत जा.

असं सांगितलं. आत्या दमली होती. घामाघूम झालेली. आत्या गरुजींना म्हणाली, गुरुजी याचं नाव टाका. मग भारंबे गुरुजींना म्हणाले, आत्या तुम्ही काळजी करु नका. ह्या फॉर्मवर अंगठा ठेवा. सगळी माहिती मी भरुन घेईन. तुमी आता घरी जा. शाळा सुटल्यावर मी आणतो आबाला घरी. आत्या घरी गेली.

पांढरीशुभ्र टोपी. लख्खं पांढरं धोतर, गोरेपान गुरुजी, वर्गात आले.

आल्या आल्या त्यांनी माज्याकडं पाहिलं. रडू नको असं डोळ्यांनीच खुणावलं. मी चूप. गुरुजींच्या अगदी समोरच मी बसलेला. अगदी टेबलाजवळ. थोडया वेळानं भारंबे गुरुजी पुन्हा आले. तो अंगठा ठेवलेला फॉर्म त्यांनी बहुधा भरला असावा. त्या पांढऱ्याशुभ्र गुरुजींच्या ताब्यात दिला. गुरुजींनी तो लागलीच कपाटातल्या फाईलीत ठेवला. माझ्याकडं हसऱ्या चेहऱ्यानं पाहत भारंबे गुरुजी म्हणाले, आबा मी शाळा सुटल्यावर येतो. घाबरु नको. मी मान हलवली. ही घे पेन्सिल. मी पेन्सिल घेतली. अन् ते निघून गेले. हलवली. ही घे पेन्सिल घेतली. अन् ते निघून गेले.

आला दिवस असा गेला.

वर्गात अंदाजे पन्नासएक मुलं. पहिलीचा वर्ग तुकडी अ. शेजारी उजव्या बाजूला दुसरीच वर्ग. तर डाव्या बाजूला तिसरीचा वर्ग. दररोज शाळा भरली की, बाजूबाजूच्या वर्गामधून हजेरीचा आवाज ऐकू यायचा. आपल्याही वर्गात गुरुजींनी हजेरी घ्यावी. माझं नाव पुकारावं. राकेश गोविंदा महाजन. मग मी म्हणेल. हजर गुरुजी, पण आमच्या वर्गात हजेरी कधी झालीच नाही. गुरुजी सकाळी वर्गात आले की, सर्व मुलांच्या तोंडाकडं पाहून घ्यायचे. मग अमूक आला नाही का रे? कुठं गेलाय तो असं गैरहजर मुलांविषयी तपास करायचे. अन् मान खाली घालून भराभर हजेरी पूर्ण.

वाऱ्यासारखे दिवस निघून गेले.

गुरूजी वर्गात फार कमी वेळ असायचे. बदलीच्या प्रयत्नात होते. नेहमी इतर गुरुजींसोबत बदलीच्या गोष्टी करायचे. शिवाय त्यांची शिकवण्याची पध्दत वेगळी होती. फळ्यावर फळाभरुन काहीतरी लिहून दिलं की सरळ ऑफिसात. मग एक हुशार मुलगा हातात एक फुटपट्टी घ्यायचा. फळ्यावर टेकवायचा. तो बोलायचा. त्याच्या मागोमाग आम्ही. शाळा सुटेपर्यंत तोच कार्यक्रम. एका मुलाला मी विचारलं. हा मुलगा एवढा हुशार कसा? तो म्हणाला, हा मुलगा पहिलीत दोनदा नापास झालाय. मग मी त्या पोराला पाहिलं की पोट धरुन धरुन हसायचो. मला हसू आवरणं कठीण व्हायचं.

आता मी रोज शाळेत येत होतो. इलाज नव्हता. घरी राहायचं नाव जरी काढलं तरी आत्या आठवायची.

एके दिवशी आमच्या वर्गात एक बाई आल्या. नव्या बाई. वेणूबाई. पांढऱ्या शुभ्र गुरुजींची अखेर बदली झाली होती. वार्षिक परीक्षा जवळ आली होती. वेणूबाई अतिशय गरीब. म्हणजे स्वभावाने. मायाळू. तळमळीनं शिकवायच्या. शाळेची गोडी वाढली. अभ्यास करुन लागलो. थोडं थोडं वाचता येऊ लागलं होतं. मग मी रस्त्यावर जे नजरेस पडेल ते वाचायचो. दुकानावरचा बोर्ड वाच, हॉटेलचा फलक वाच. जे दिसेल ते तोडकं मोडकं वाचायचो. वेणूबाईचा माझ्यावर जीव. मी लाडका विद्यार्थी.

आमच्या घरी पै-पाहुणे नेहमीच यायचे. पाहुणे आले म्हणजे ते मला हमखास एक प्रश्न विचारायचे कितवीत जातो? मग मी सुरु पडायचो... मी पहिलीत जातो. माझ्या शाळेचं नाव जि.प.मराठी मुलांची शाळा नंबर एक. माझ्या बाईचं नाव वेणूबाई. माझं शाळेतलं नाव राकेश. मला दोन मित्र आहेत... हातावर दहा पैसे बक्षिस. मगच माझी गाडी थांबायची.

वार्षिक परीक्षा झाली. मग काही दिवस सुटी. आखाजीला निकाल लागला. निकाल पाहून मला जेवढा आनंद झाला. तेवढंच दु:ख. आनंद याचा की मी परिक्षेत पहिला आलो. अन् दु:ख याचं की गुणपत्रकावर विद्यार्थ्यांच्या नावापुढं राकेश गोविंदा महाजन यांच्याऐवजी लिहिलं होतं,

...आबा गोविंदा महाजन.



# इथ पासून ...इतिपर्यंत !

डॉ.विद्या पाटील
प्राचार्य- जिल्हा शिक्षण
प्रशिक्षण संस्था धुळे

शिक्षण ही एक प्रक्रिया आहे.मग ते औपचारिक असेल किंवा अनौपचारीक हे फक्त सांगून न थांबता, मी आत्मसात करत गेली.आणि अनौपचारिक शिक्षण चालूच ठेवले, ते आजतागायत चालूच आहे.

१/१२/८३ मातृसेवा संघ प्राथमिक शाळेतील माझा पहिला दिवस.सतत ११वर्ष मी या शाळेत विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम मंनोरजक पध्दतीने सादर करून शिकवत गेली,शिकवत असतानाच स्वतःही शिकत गेली. एम ए,बीएड एमएड, एमफिल, पीएचडी..असा शिक्षणाचा पल्ला गाठत ज्या परिसरात माझे बालपण गेले,नव्हे प्राथमिक शिक्षण घेतले ,ज्या शासकीय शिक्षण संस्थेत अध्यापकाचार्य म्हणून माझे बाबांनी सेवा दिली,जेथे माझे डीएड झाले त्याच शासकीय संस्थेत मी १/१२/९८ रोजी अध्यापकाचार्य म्हणून रूजू झाले आणि आयुष्यातील मैलाचा दगड गाठला..

लवकरच शासकीय शिक्षण संस्था DIET मध्ये रुपांतरीत झाल्या.आणि मला अवघ्या दोन वर्षात जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था पनवेल, या संस्थेत वर्ग एक अधिकारी म्हणून प्राचार्य पदावर काम करण्याची संधी मिळाली. दोन वर्ष सेवा देत २००२ मध्ये जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, धुळे येथे बदली झाली.एक वर्षानंतर लगेच २००३ जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था,जळगाव येथे बदली झाली आणि २००५ पर्यंत वर्ग एक म्हणून काम करून २००५ ला पुन्हा जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था,धुळे येथे बदली झाली..दरम्यान धुळे जिल्ह्याची विभागणी झाल्यामुळे विभागीत नंदूरबार जिल्ह्याला नवीन जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेची मान्यता मिळाली.आणि त्या नवनिर्वाचित संस्थेत २०१० साली प्राचार्य म्हणून एक मोठी जबाबदारी मी स्विकारली.येथे मला शुन्यातून जग निर्माण करायचे होते.मी माझ्या प्रयत्नांना कस लावला आणि अल्पावधीतच प्रयत्नांना यश आले.तिथले काम मार्गस्थ लावत २०१४ पुन्हा एकदा जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, धुळे येथे प्राचार्य पदावर रूजू झाले आणि आजअखेर याच संस्थेत सेवा दिली. याच संस्थेत अध्यापकाचार्यपासून ते वर्ग एक अधिकारी अशा प्रदीर्घ प्रवासानंतर सेवानिवृत्त होत आहे...केवढं माझं भाग्य!

प्राथमिक शाळेत काम करत असताना माझ्या आवडत्या डॉ.अष्टपुत्रे, कांताबेन शहा,संघवी मॅडम, धाराशिवकर मॅडम अशा ज्ञानपिपासु आणि शिक्षणप्रेमी व्यक्तींसोबत मला काम करण्याची संधी मिळाली. या शाळेने मला मोठं केलं.आयुष्यात आधाराची फार गरज असते आणि या शाळेने मला खूप आधार दिला नव्हे माझ्यासाठी आधार ठरली.म्हणून मी या शाळेचे ऋण कधीच विसरु शकत नाही.

अध्यापकाचार्य म्हणून रूजू होणे होते तेव्हा एकीकडे शाळा सोडण्याचे दुःख आणि दुसरीकडे उत्तुंग झेप घेण्याची महत्त्वाकांक्षा अशा द्विधा मनस्थितीत असताना अध्यात्माचा सोबतीमुळे योग्य निर्णय घेण्याची ताकद मिळाली.शाळेत असताना खूप मोठमोठी स्वप्न पाहीली होती. पण एवढं मोठं स्वप्न कधीच नव्हते पाहीले..पण हे सर्व करताना...कितीही मोठं संकट असेल पण तुमच्यावर जर गुरूकृपा असेल तर मार्ग किती सुकर होतो याचा पदोपदी अनुभव येत होता.

१९९८ साली, वर्ग एक अधिकारी म्हणून प्राचार्य पदावर काम करण्याची संधी मिळाली तेव्हा प्रिया (मुलगी) दहावीला होती.माझ्या पुढे यक्षप्रश्न. माझं

करियर कि मुलीचे?दोघेही सारख्याच तोडीचे..पुन्हा एकदा गुरूकृपा! योग्य निर्णय घेण्याची ताकद मिळाली. यात प्रियाचा सर्वात मोठा त्याग..माझी साथ देत, माझं मनोबल वाढवत,माझ्या करियरला प्राधान्य दिले..असं म्हणतात कि, जन्मदात्याचे ऋण कधीच फेडू शकत नाही..पण माझ्याबाबतीत तर मी म्हणेल कि मी माझ्या प्रियाचे ऋण कधीच फेडू शकत नाही. आईबाबांचे सुध्दा आभाळभर ऋण आहेत. ८३ ला प्रियाचा जन्म झाला. संकटानी जीवनात प्रत्येक वळणावर परीक्षा घेतली.परमेश्वर परीक्षा घेत राहीला.. पण गुरूकृपा जगण्याची ताकद देत राहिला.त्या मागचे उद्देश मला कधीच समजला नाही.पण नेहमीच सुखद आणि दुःखद आश्चर्याचे धक्के ठरलेले असायचे. आयुष्यात सगळ्या म्हणी जवळून अनुभवल्या.सोन्याला तापवून, ठोकूनच दिव्यत्व मिळते..याचा प्रत्यय येत गेला.. परमेश्वर व्यक्तिची सहनशक्ति पाहुन संकट देत असतो. सोशेल एवढं दुःख देतो..मग माझे दुःख संघर्ष आणि संकट पाहता माझ्या सहनशक्तीची कल्पना न करणेच बरे.आयुष्यात उंची गाठताना गुरूकृपेबरोबर माझ्या दृश्य ,अदृश्य हितचिंतकाची साथ सोबत आशिर्वाद मिळाले, त्यांची मी ऋणी आहे.सेवानिवृत्ती बरोबर आजचा दिवस, माझ्यासाठी सगळ्यांचे ऋण व्यक्त करून ऋणमुक्त होण्याचा.

आयुष्यातील सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे ज्या सराव पाठशाळेत मी शिकली त्याच परिसरातील शासकीय अध्यापक विद्यालयात डीएड केले आणि गुरूकुपेने याच अध्यापक विद्यालयात अध्यापकाचार्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली, योग आला. योगायोगाने विद्यालयाचे डायटमध्ये रूपांतर झाले ( जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था ) आणि मला जेष्ठ अधिव्यख्याता, वर्ग एक अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. एवढ्यावरच भाग्य थांबले नाही.तर या शिखर संस्थेत प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली..पाठोपाठ संस्थेत DATE ह्या प्रशासकीय कर्मचारी प्रशिक्षण संस्थेचे समायोजन करण्यात आले. पुन्हा एकदा प्राचार्य सोबत D-ATE संस्थेची संचालक म्हणून सेवा देण्याचा योग मिळाला आणि जिल्ह्यातील सर्व कार्यालय आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांशी जवळचा संबंध येत एक माणुसकीचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले.

एकाच वास्तूत शिकणे,शिकविणे आणि सेवानिवृत्त होणे.केवढी ही गुरूकृपा! आयुष्याची जनसेवेची सुरुवात ज्या वास्तूत केली,त्याच वास्तूत शैक्षणिक प्रवाहतील अतिउच्च पदी विराजमान होऊन तिथेच सेवानिवृत्त होणे. केवढा हा योगायोग! हे कोणाच्या नशिबात असते? हि गुरूकृपा नाही तर काय? म्हणूनच म्हणावे वाटते,या जन्मावर शतदा प्रेम करावे.

शाळेत असताना माझ्या कल्पकतेने जे छोटे छोटे उपक्रम मी राबवायची तेच शैक्षणिक प्रवाहतील. एक महत्त्वाचा घटक,संकल्पना ठरेल असे कधी वाटले नव्हते. शिक्षक म्हणून माझा अनुभव अधिकारी म्हणून काम करताना क्षणोक्षणी उपयोगी पडला.माझी अनुभवाची शिदोरी मला उपयोगी पडली...पुन्हा एकदा मी शाळेचे ऋण व्यक्त करते. मेडिकलला जाऊन डॉक्टर होण्याची लहानपणीची इच्छा शिक्षण खात्यातील डॉक्टर होऊन पूर्ण केली.मला डॉक्टर होता आले नाही याची खंत राहीली नाही. आयुष्य किती सुंदर आहे.याचा क्षणोक्षणी प्रत्यय येत गेला. नोकरीत प्रवेश करताना जेवढा आनंद, उत्साह, अगतिकता होती,तिच या क्षणाला, निवृत्त होताना तशीच कायम आहे. प्रामाणिकपणे काम करताना जे समाधान, तृप्ती,आनंद मिळाला त्याची पूर्णाहूती म्हणजे सेवानिवृत्ती..दोन्ही सारखेच आनंदाचे क्षण..

सेवेत असताना जी सेवा घडली,त्या सेवेचा परतावा घेतलेला असल्यामुळे सेवानिवृत्तीचा कार्यक्रम करायचा नाही अशी सुप्त इच्छा योगायोगाने म्हणा किंवा गुरूकुपेने म्हणा पूर्ण होत आहे.याचा मनस्वी आनंद होत आहे.हे सर्व त्याचेच,तोच करता करविता.म्हणून त्या अदृश्य शक्तीला समर्पण.आयुष्यात.ज्या चांगल्या गोष्टी, घटना, प्रसंग, अनुभवले त्या सर्वांचे श्रेय प्रसंग देणा-याला समर्पित....

आनंदाचे डोही...



**सुनिल मोरे**
शिंदखेडा जि.धुळे
९६०४६४६१००

# अश्रूंची झाली फुले !

भूषण हा आमच्या शाळेतील पहिल्या इयत्तेत शिकणारा विद्यार्थी. पहिलीत शाळा प्रवेश घेतल्यापासून इतर सर्व मुले शाळेत नियमित येत असताना या भूषणला मात्र शाळेबद्दल कसली अनासक्ती झाली कुणास ठाऊक तो शाळेत येतच नव्हता.वारंवार पालकांशी भेट घेऊन त्याला शाळेत पाठवा म्हणून सांगितले, प्रसंगी आम्ही घरापर्यंत पोहोचलो. मात्र त्याची अनासक्ती,पालकांचे पाल्याविषयीचे अतिलाड त्याचप्रमाणे दररोजच्या शेतीकामातून पालकांना पाल्याकडे देता न येणारा वेळ अशा काही कारणांनी भूषण शाळेत येईनासा झाला.मोफत गणवेश मिळाल्यावर आता तरी तो शाळेत येईल म्हणून त्याला गणवेश घरपोच केले मात्र सर्व काही व्यर्थ.पाहिलीच्या वर्गातल्या हजेरीपटावर पहिलेच नाव त्याचे म्हणून काय करावे असा प्रश्न हजेरी घेतांना दररोज डोळ्यासमोर यायचा आणि जे हजर आहेत त्यांना सोबत घेऊन मग दररोजचे अध्यापन सुरू होत होते. मात्र त्याचवेळी शिक्षक म्हणून आम्ही कमी पडतोय हे सुद्धा तितक्याच प्रकर्षाने बोचत होतं.गेल्या काही दिवसांपासून तर का कुणास ठाऊक भूषण शाळेत आला पाहिजे म्हणून पालकांशी अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न देखील केला.एरवी शाळेच्या मार्गावरून त्याचे पालक शेतात जातांना त्याला त्यांच्या आडोश्याला लपवून घेऊन जातांना आम्ही नेहमी पाहायचो.बऱ्याचवेळा बैलगाडीतून शेतात जातांना त्याची आई त्याला पदराखाली लपवून घेऊन जायची.अशावेळी काय करावे सुचत नसे.पालकांना कितीतरी वेळा आम्ही समजावून सांगितले. मात्र त्याचा फार परिणाम पालकांवरच कदाचित झालेला नव्हता आणि त्यामानाने भूषण तर फक्त सहा वर्षाचा त्याला कसे ते समजायचे ? आता शेतीची बरीचशी कामे आटोपली होती म्हणून की काय किंवा घरी राहून यांच्याकडे खूप लक्ष द्यावे लागते, हा दिवसभर गावात कुठे कुठे हिंडतो आणि सारी मुले शाळेत जातात ,किंवा शिक्षक सारखे सांगताय यामुळे त्याची आई गेल्या आठवड्यापासून दररोज त्याला जोर जबरदस्ती करून एका हातात काठी तर दुसऱ्या हातात त्याच्यासाठी कुरकुरे,बिस्किटे अशी सामग्री घेऊन येत होती. माउलीला खुप आशा होती तिच्याही मुलाने शिकावं मात्र ती सुद्धा त्याच्या बालहट्टापुढे हताश झाली होती.घरातून त्याला अनिच्छेने मारून झोडून आणत होती आणि शाळेच्या दारात पाय ठेवताच मात्र भूषणची नकारघंटा आणि रडणे कमालीचे वाढत होते.त्याच्या तश्या वागण्याने ती अधिक चिडून त्याला माझ्यासमोरच आणिक मारायची.मला ते कसेतरी वाटायचे. मात्र तो देखील तिच्या संतापाच्या अनेक पटीने भोकाड पसरत असे.तीन-चार दिवसांपूर्वी तर त्याला त्याच्या आजोबांनी शाळेत आणून बसवले नसेल इतक्यात तो पळाला आणि पळता पळता त्याने स्वतःला रस्त्यावर साचलेल्या डबक्यात लोळवुन घेतले. स्वतःच्या पालकांकडून बसलेल्या माराबद्दल जणू तो त्यांना प्रतिसाद देत होता. हे सर्व दृश्य पाहून माझ्यातला संवेदनशील शिक्षक मात्र खूप विचाराधीन होत होता.मंगळवारी अशीच त्याची आई त्याला शाळेत घेऊन आली. मला म्हटली, 'सर काल ना मी याचे हातपाय बांधून दिवसभर खोलीत कोंडून ठेवले होते.आता तो बसेलच शाळेत'.मी म्हटले,' अहो लहान

आहे तो, त्याला इतके मारू नका किंवा बांधून-कोंडून ठेऊ नका'. भूषणसाठी मी मनातल्या मनात बालमानसशास्त्राच्या प्रकरणांची पाने उलटवू लागलो.तेंव्हा एक वाचलेला प्रसंग आठवला.

एका धनाढ्य व्यक्तीने कुत्रा पाळायचे ठरवले. अतिशय जातिवंत आणि नामांकित जातीच्या कुत्र्यांबाबत त्याने माहिती मिळवली आणि एक छोटेसे गोंडस असे पिलू आणले.घरात सर्व गोष्टींची सुबत्ता असल्याने पिलूसाठी सर्व काही उपलब्ध होते.पिल्लाच्या देखरेखीसाठी नोकरचाकर होते. वेळोवेळी त्यासाठी पौष्टिक खाद्यपदार्थ दिले जात होते.मालकसुद्धा वेळ काढून त्याची चौकशी करायचा. आपल्याकडे असणारा हा कुत्रा हा खूप हुशार झाला पाहिजे असे त्याला नेहमी वाटायचे.एकदा त्याच्या मित्राने त्याला सांगितले की शार्क माश्याच्या तेलापासून बनवलेले औषध जर कुत्र्याला पाजले तर ते अधिक हुशार होतात.मग कसला उशीर ? वेळ न दवडता त्याने परदेशातून अतिशय महागडे असे ते औषध मागवले.दुसऱ्या दिवशी त्याने नोकराला सांगितले याबाबत सांगितले आणि कुत्र्याला औषध पाजण्यासाठी आणायला सांगितले.नोकराने कुत्र्याचे चारही पाय पकडून त्याला दिवाणखान्यात आणले, त्याचे तोंड उघडण्याचा प्रयत्न करू लागला मात्र कुत्र्याने तोंड घट्ट मिटून घेतले होते.प्रयत्न करूनही ते त्याला औषध पाजू शकले नाहीत.दुसऱ्या दिवशी पुन्हा हाच प्रकार झाला.तिसऱ्या दिवशी एका नोकराने कुत्र्याचे पाय घट्ट पकडले तर दुसऱ्याने त्याचे तोंड औषध पाजण्यासाठी दाबून ठेवले.मालकाच्या हातात औषधाची बाटली आणि पाजण्यासाठी मदत करणारे दोघे नोकर असे तिघांच्या ताकदीला न जुमानता कुत्रा जिवाच्या आकांताने पाय सोडवून घेऊ लागला आणि अशा झटापटीत त्याने स्वतःला सोडवून घेऊन धूम ठोकतांना औषधाची बाटली पडून फुटली आणि सारे औषध फरशीवर सांडले गेले.मालक खुप संतापला. एवढे महागडे औषध मी मागवले आणि ते न पिता वाया घालवले म्हणून मनातून चिडला आणि हातात काठी घेऊन कुत्र्याला शोधू लागला.नोकरीही त्याला शोधू लागले.आलिशान बंगल्याच्या साऱ्या खोल्या पाहून झाल्या मात्र तो कुठे दिसेना म्हणून मालक दिवाण खान्यात सोप्यावर हताशपणे बसला आणि समोरचे दृश्य पाहून आश्चर्यचकित झाला.बंगल्यात सगळीकडे ज्याला शोधले तो कुत्रा फरशीवर पडलेले औषध जिभेने चटाचटा चाटत होता.मालकाने या घडलेल्या प्रसंगावर खूप वेळ विचार केल्यावर त्याला जाणवले की चूक आपलीच आहे.औषध पाजण्याची जोरजबरदस्तीची जी पद्धत आपण अवलंबिली ती चुकीची होती

भूषणच्या रडण्याचा आवाज आणि आकांडतांडव-गोंधळ यामुळे मी भानावर आलो.मी त्याच्याजवळ जायच्या आत त्याने रडत रडता धूम ठोकली. मात्र काही अंतरावर असणाऱ्या एका ग्रामस्थाने त्याला धरून ठेवले होते. मात्र त्यांनाही तो जुमानत नव्हता.त्यांच्या हाताला चावा घेण्याचा प्रयत्न करत होता.कसेबसे त्या ग्रामस्थाने भूषणचे हात पाय पकडून त्याला शाळेत आणले.मी वर्गात मुलांची हजेरी घेत होतो.हजेरी घेण्याचे काम तसेच बाजूला ठेऊन भूषण वर्गातून पळू नये म्हणून मी दरवाज्यात उभा राहिलो. खूप मोठ्याने रडताना तो पळण्याच्या तयारीत होता.तसा तो धावत आला आणि मला जोर दाखवत दरवाजातून बाहेर मुसंडी मारण्याचा प्रयत्न करू लागला.मी ही तितक्याच वेगाने त्याला प्रतिकार करू लागलो आणि त्याच्या हाताला खांद्याजवळ धरून त्याला आता ओढताना तो अधिकच किंचाळला आणि त्याने माझा हात बाजूला फेकला.काय झाले म्हणून विचारले तेंव्हा तो म्हटला, 'आठे लागेल शे माले.मनी मम्मीनी माले कालदीन काठी घाई मारेल शे ते दुःखी राह्यनं.' भूषण शाळेत गेला पाहिजे यासाठी सर्वात सोयीस्कर म्हणून त्याच्या पालकांनी निवडलेला हा कदाचित शॉर्टकट उपाय होता. मी म्हटलं, 'ठीक आहे,आता तू अजिबात रडू नको.बघ इथे कृपाल,हर्षल,कैलास,ओम... असे कितीतरी मुलं

आहेत.तू कुणाजवळ बसतो सांग'?....'नई मी कोणाजोडे नही बसाव'.मी माझ्या टेबलाजवळ त्याला घेऊन गेलो.त्याचे रडणे मात्र सुरूच होते.मी माझ्यापरीने त्याची समजूत काढत होतो.रडून रडून त्याच्या डोळ्यातील अश्रू आणि नाकातून वाहणारी सर्दी यांचा जणू मिलाफ त्याच्या चेऱ्यावर झालेला होता.खाली न बसता पाठीवर दप्तर घेऊन तो तसाच उभा होता.अनेक प्रकारे त्याला मी समजावू लागलो पण व्यर्थ जात होते सगळे प्रयत्न.त्याने रडणे थांबवावे म्हणून मी त्याला माझ्याकडे असलेले चित्र,मुलांकडून जमा केलेल्या गोट्या, खेळणे देत होतो पण तो काही शांत राहत नव्हता.मी त्याला म्हटले, 'काय पाहिजे तुला ते तरी सांग '? तो म्हटलं , 'माले घर जाणं शे'.कशासाठी तू घरी जाणार आहेस असे विचारल्यावर तो म्हटला, ... 'मना मम्मीनी डीग ना लाडू बनायेल शेत त्या खावाले जान शे'.मी म्हटलं, 'अरे इथे छान छान खिचडी मिळते खायला,सर्व मुलं एकत्र जेवतात.' 'नई माले खिचडी नई खावानी.' तुला लाडू आवडतात तर ? मी देतो चल. मी आणलेल्या जेवणाच्या डब्यात ठेवलेला लाडू आठवण करून खा असे बजावणाऱ्या माझ्या पत्नीचे शब्द मला आठवले. डबा उघडून त्यातील एका खणातून लाडू काढला आणि भूषण ला दिला.रडता रडताच त्याने तो खाल्ला.आता काहीसा तो शांत झाला होता. त्याला बाहेर घेऊन जाऊन त्याचा चेहरा मी स्वच्छ धुतला .खूपवेळ रडल्याने त्याच्या चेऱ्यावरील आसवांचे आणि सर्दीचे ओघळ आता गेले होते.नंतर मी मुलांची हजेरी घेणे सुरू केले. तितक्यात पुन्हा तो म्हटला, 'सर, माले घर जाण शे'.मी त्याला म्हटले,' अरे थांब थोडा मग जा.हे बघ तुझे हजेरीवर नाव'.तितक्यात तो म्हटला,'मनं नाव नई पडेल शे'....मी नई थांबाव'....मी म्हटलं हे बघ ना तुझं नाव पण त्याला कुठे ते वाचता येणार !!! एका समारंभात मला उपस्थिती निमित्त मिळालेली बॅज माझ्या खिश्यात होती. तिच्यावर मी दुसरा कागद चिकटवून त्यावर त्याचे नाव लिहिले आणि ती बॅज त्याच्या शर्टाला लावली आणि त्याला म्हटले ,'हे बघ आता तुझे नाव पडले बर का पहिलीत'.तसा तो खुश झाला.त्याच्या शर्टाची कॉलर व्यवस्थित करून चेऱ्यावर थोडी पावडवर मुलींकडून मागवून घेऊन लावली,शर्ट इन करून दिला.वातावरण निर्मिती व्हावी,मनोरंजन व्हावे म्हणून स्वर्गात आकाशगंगा, गंगेला सोनेरी घाट.....चला आनंद आली बहार हे आनंददायी कृतीयुक्त गाणे म्हटले. ते ऐकतांना आणि सर्व मुलं नाचताय त्यालाही आवडले कारण त्याची चर्या आता बदलली होती,त्याची चित्तवृत्ती प्रफुल्लित झाली होती.आरसा मागवला आणि त्याला दाखवला आणि म्हटलो,'आता बघ किती छान दिसतो तू '!! स्वतःचा बदललेला चेहरा जणू त्यालाही नवा वाटत होता की काय म्हणून तो छानसा हसला आणि मी तात्काळ मी मोबाईल घेऊन त्याच्यासह तो क्षण मोबाईल मध्ये टिपला.काही वेळापूर्वी भरती ओहोटीच्या वेळी समुद्राला आलेलं उधाण,भरती ओहोटीचा समा-निखार सर्वकाही शांत झाल्यासारखे वाटले. आसमंतातील सारे मळभ दूर होऊन एक अनोखे क्षितिज जणू मोकळे झाल्यासारखे वाटत होते.त्याला मी माझ्या जवळ बसवले.अधून मधून त्याच्याशी लाडिकपणे गप्पागोष्टी करत होतो आणि त्याच्या अंतर्मनाचा शोध घेत होतो.दुपारच्या सुटीत सर्वांसोबत बसून जेवला,खेळाचा तासिकेला मनमुराद खेळला. शाळा सुटताना मी त्याला जवळ बोलावले आणि मी त्याला काही सांगणार त्याच्या आतच तो म्हटला,'सर, आते मी दररोज शाडामा ईसू' त्यानंतर दोन दिवसांपासून भूषण दररोज न चुकता ते ही अगदी टापटीप आणि मी दिलेली बॅज शर्टाच्या खिश्यावर दिमाखाने लावून शाळेत येतोय.

या प्रसंगातून मी खूप काही वेगळे केले असे नाही मात्र जे केले ते सार्थकी लागले याचा आनंद मात्र अंतःकरणाला खूप सुखावून गेला.प्रेमाने अश्रूंची फुले देखील होतात आणि सुगंधात स्वतः न्हाऊन निघतात हे तितकेच खरे.



# सागरी ऊर्जा...

मेघश्री दळवी
मुंबई
email-meghashri@gmail.com

खनिज इंधन संपत चालल्याने इतर अपारंपरिक उर्जास्त्रोतांकडे आता आपण आपोआप वळतोय. गेली दहा वर्षं सौर ऊर्जा, बायोमासपासून ऊर्जा, पवनऊर्जा यांच्यावर भर देतो आहोत. तसाच अलिकडला एक महत्वाचा ऊर्जास्त्रोत आहे सागरी ऊर्जा.

समुद्राच्या लाटा आणि भरती-ओहोटी यात पाण्याची जी वेगाने हालचाल होते, त्याचा वापर करून विद्युतजनित्र फिरवले जाते आणि विद्युतऊर्जा मिळते. ही सागरी ऊर्जा. ऊर्जानिर्मितीचा हा मार्ग सोयीचा आणि स्वच्छ आहे. त्यात आवाज, पाणी यांच्या प्रदूषणाचा धोका नाही. तसंच आपण निसर्गात काही ढवळाढवळ करत नसल्याने याचा तोटा कोणताही नाही. समुद्राचं पाणी आपल्याला प्रचंड प्रमाणात उपलब्ध असल्याने अशा ऊर्जानिर्मितीला खीळ कधीही बसणार नाही. ही जनित्रं लहान असल्याने देखभाल सुद्धा सोपी पडते. सगळ्या खंडांना उत्तम किनारे लाभले असले तरी त्यातली काही ठराविक किनारेच सागरी उर्जेसाठी उपयोगी पडतात. मुख्यत: भरपूर उंच खळाळत्या लाटा, आणि तिथे यंत्रणा उभारण्यासाठी सोय अशा जागीच सागरी ऊर्जा मिळवणं शक्य होतं.

ऑस्ट्रेलियाला सुदैवाने असे किनारे मिळाले आहेत. त्यामुळे तिथे बर्यापैकी प्रमाणात सागरी उर्जा मिळवली जाते. पाइक रिसर्च ही कंपनी अपारंपरिक उर्जास्त्रोतांवर संशोधन करते. तिच्या मते सागरी उर्जेसाठी दक्षिण कोरियाचा किनारा सर्वोत्तम आहे. आणि तो देश याचा फायदा करून घेत साडेसहाशे मेगावॉट विद्युतशक्ती दरवर्षी निर्माण करतो. जगातलं सर्वात मोठं भरती-ओहोटीचं ऊर्जाकेंद्र दक्षिण कोरियात आहे.चीनमध्ये नव्या तंत्रज्ञानाचा लगेच वापर करण्याकडे कल आहे. आज तिथे वर्षाला सत्तर गिगावॉट विद्युतशक्ती लाटा आणि भरती-ओहोटीतून मिळवली जाते. हायड्रोइलेक्ट्रिक विद्युतकेंद्र उभारण्यासाठी नद्यांवर धरण बांधणे, तिथल्या विस्थापितांना योग्य जागा मिळवून देणं, किंवा अशा केंद्रांची देखभाल करणं ही सर्व खर्चिक आणि वेळखाऊ कामं असल्याने त्याऐवजी सागरी ऊर्जा वापरणं जास्त फायदेशीर ठरतं. तेव्हा चीन आणखी काही असे प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न करत आहे. ब्रिटन हे बेट असल्याने तिथेही अशा ऊर्जानिर्मितीला भरपूर वाव आहे. हळूहळू तिथे हा उर्जास्त्रोत गंभीरपणे घेतला जातोय आणि नव्या प्रकल्पांवर काम सुरू केलं जातंय. फ्रान्समध्येही असे बरेच प्रकल्प आहेत. लाटांपासून ऊर्जा मिळवण्याचा जगातला सर्वात मोठा प्रकल्प स्वीडन मध्ये आहे. काही युरोपीय देशांना असे उपयुक्त किनारे नसल्याने तिथे मात्र अशी ऊर्जा मिळवणे शक्य होत नाही. कॅनडा हा सागरी ऊर्जा मिळवणारा एक मुख्य उत्तर अमेरिकन देश. विशेषत: उत्तर भागात भरपूर लाटा आदळणारे किनारे तिथे आहेत. त्यामुळे लाटा आणि भरती-ओहोटीमधून कॅनडा वर्षाला चाळीस मेगावॉट विद्युतशक्ती मिळवतो.

भारताला साडेसात हजार किलोमीटर लांबीचा किनारा आहे. त्यातून एकूण साठ गिगावॉट सागरी विद्युतशक्ती मिळवता येईल. मात्र आपल्याकडे हा स्रोत अजून खूप नवा आहे. लाटा आणि भरती-ओहोटी हे तितकेसे नियमित नसल्याने त्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा सौर ऊर्जा आपल्याला काही ठिकाणी जास्त सोयीची पडत आहे. पण ओदिशा, पश्चिम बंगाल, आणि कच्छ इथे अशी सागरी ऊर्जा खात्रीने मिळवत येईल. फक्त ती आर्थिक दृष्ट्या फायदेशीर करण्याकरता त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागेल.

# गुरूजींवर प्रेम करणारी मुलं !



**युवराज माने**
जि.प.प्राथमिक शाळा
पारडी ता.शेलू जि.परभणी

तुम्ही आलात म्हणून आमचे गुरूजी गेले ,तुम्ही आला नसता तर आमचे गुरुजी आम्हालाच राहिले असते...नेहाचं हे बोलणं ऐकताच वर्गात एक गंभीर शांतता पसरली.....।

आपणच शिकणारे असतो नि शिकवणारे असतो. मजा येते दोन्ही भूमिका एकदम करताना!

यात आनंदही असतो.

काळ बदलताना कधी सुंदर पावलांचे ठसे सापडतात, त्यावरून चालताना आपलीच वाट सापडते........

मा.रेणू दांडेकरांनी या अनुभव शिल्पातून त्यांना सापडलेली वाट ज्याप्रमाणे स्पष्ट केली आहे त्याचप्रमाणे चालता चालता आपलीच एक स्वतःची वेगळी वाट मलाही सापडली .एक तप होत असतांना मागील २ शाळांमधील, शाळेतील विद्यार्थ्यांमधील आणि त्या गावातील गावकऱ्यांमधील माझे जे स्नेहबंध जुळले होते ते आयुष्यभर अतूट असेच म्हणावे लागतील. मात्र या दोनही ठिकाणी आनंददायी शिक्षणाचा प्रवास करताना खरोखरच भविष्यकालीन आपली स्वतःची एक वेगळीच वाट सापडल्याचे समाधान लाभत आहे. मुलांच्या भावविश्वाशी साहचर्य साधल्यामुळे व गावकऱ्यांच्या मनात शाळेची जागा निर्माण करून त्यांचं मिळवलेले योगदान यातून एक शिक्षक कशा पद्धतीने गावच्या 'मानवविकास' केंद्राची उत्तम पणे उभारणी करू शकतो हे लक्षात आलं.अगदी सहजपणे आपल्याला हे करता आले यातून भविष्यातील माझ्या 'शिक्षपणाचे नवनिर्मितीचे अनेक देखणे सोहळे' नक्कीच अनुभवायला आणि इतरांनाही आनंद घ्यायला मिळतील यात शंका नाही .अशा वेगवेगळ्या विचारांची मालिका घेऊन मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पलखेडा शाळेचा निरोप घेतला. पलखेडा शाळेचा निरोप घेताना ज्या पद्धतीने पाऊलं जड झाली होती किंबहुना तेथील विद्यार्थी, सहकारी व पालक यांचे निरोपाप्रसंगीचे ढळणारी अश्रू पाहून मला कृतार्थ झाल्यासारखं वाटत होतं .कुठल्याही प्रकारचं रक्ताचं नातं नसतांना केवळ एक विद्यार्थ्यांसाठी व गावकऱ्यांसाठी एक शिक्षकाचं नात जोडल व त्या स्नेहातुन आणि त्यातून निर्माण झालेलं नातं निरोपाप्रसंगी सर्वांनाच लक्षात आलं .छोट्या छोट्या डोळ्यातून वाहणारे अश्रू , व मोठ्या माणसाच्या हृदयातून आपल्याप्रती असलेल्या स्नेहभावना हीच माझी 'खरी कमाई' आहे माझ्यातील शिक्षकपणानं काही मिळवलं ते घेऊन मी नवीन लेकरासोबत स्नेह जुळवण्यासाठी निघालो होतो. नवीन 'आनंदाची झाडं' माझी वाट पाहत होती...

मुलांविषयीचे वाटणारे 'प्रेम' हा शिक्षकाचा मौल्यवान गुण आहे.मुलाच्या जागी शिक्षकाला स्वतःला कल्पिता आले पाहिजे.आपणही एकेकाळी मूल होतो हे जो माणूस कधीही विसरत नाही तोच खरा शिक्षक होऊ शकतो...

आपल्या भोवतालचा निसर्ग हा मोठा चतुर शिक्षक आहे.गोंदिया जिल्ह्यातील निसर्ग हा तेथील लोकांच्या जीवन पद्धतीत कसा उत्तम शिक्षकाची भूमिका बजावत आहे हे पहात व विचार करत परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथ पारडी येथे जिल्हा बदली होऊन रुजू होण्यासाठी निघालो.सेलू तालुक्यातील वालूर कन्या

केंद्रांतर्गत असलेलं शेवटचे टोक असलेलं गाव म्हणजे पारडी. गाव कसलं तीन-चार तांडे यांनी मिळून एकत्र असलेली ही वस्ती. मराठवाड्यातील निसर्गाची अवकृपा आणि रस्त्याची वानवा हे जाणूनच होतो. शाळेपर्यंत पोहोचण्यासाठीचा रस्ता अतिशय बिकट जून-जुलै महिन्यात झालेल्या पावसामुळे शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी चिखल असलेल्या वाटेने जावं लागलं. केवळ रस्ता पाहूनच माझ्या लक्षात आलं की आपल्या आयुष्यात आणखी एक नवीन आव्हान आपल्यासमोर येऊ घातला आहे. आपल्या जन्मभूमी इकडे आल्यानंतर तरी किमान आपण सहजपणे सेवा पूर्ण करू असं स्वप्न वाटू लागलं होतं .. रस्ता शालेय इमारत किंबहुना इतर अडचणी आता माझ्यासाठी नाममात्र झाल्या होत्या.

खरे शिक्षण शिकवण्यात नाही तर शिक्षक आणि मुलांच्या औपचारिक नात्यांमधून बहरते.हा खूप मोठा धडा मी स्वतः अनुभवला होता शालेय भौतिक सुविधा आणि इतर रंगरंगोटीपेक्षा मुलांशी मी जे प्रेमळ मैत्रीपूर्ण नाते विकसित करू शकत होतो हीच खरी माझी शक्ती होय. त्यामुळे चाललेलीही चिखलवाटेचं काही भीषणता मला वाटली नाही. कारण इतक्या आत मधली शाळा मला पुन्हा एकदा प्राप्त झाली खरंच हे माझ्यासाठी योग्य झालं असंच म्हणावं लागेल. कारण जिथे कमी, तिथे आम्ही .मागील अनुभव पाहता ज्याठिकाणी खरंच ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्याच ठिकाणी निसर्ग त्याला नेवून पोहोचवतो. चला पुनश्च एकदा शिक्षणाचं नवं बेट उभा करूया..आता याला पर्याय नाही अशी स्वतःच्या मनाची मनधरणी करत मी पारडी गावातील या ज्ञानमंदिरात प्रवेश केला.

सकाळची परिपठाची वेळ होती .शाळेत प्रवेश करताच उपस्थित असलेल्या सहकारी बांधवांनी माझं स्वागत केलं . दररोजच्या आपल्या गुरुजींमध्ये एक नवा चेहरा समाविष्ट झालेला पाहताच परीपाठासाठी उभे असलेले दोन-चारशे डोळे माझ्याकडे पाहू लागले . शाळेतील एका सहकारी शिक्षकांनी माझी मुलांना ओळख करून दिली. मुलांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केलं.सहकार्यांशी औपचारिक गप्पा करत असतानाच माझे डोळे या पटांगणातील चिमुकल्यावर नजर ठेवून होतो. या चिमुकळ्यांमध्ये मी शोधत होतो.... साधना ,करण, मनीषा ,करुणा ,गुलशन, राधा, ध्येयवेडी वर्षा, जिद्दी शिल्पा ,माझ्यावर प्रेम करणारा जितू. का माहित काही विद्यार्थी शिक्षकाच्या मनावर कायम अधिराज्य गाजवतात आणि आपला स्वतःचा अमीट असा ठसा त्यांच्या मनावर सोडून जातात. लेकरांच्या डोळ्यातील माझ्याप्रति असलेली ओढ पाहता थोडसं समाधान लाभलं. शाळेतील हा माझा पहिलाच दिवस. वर्ग पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग मुख्याध्यापकासह ६ सहशिक्षक. परिपाठ झाल्यानंतर मुख्याध्यापक कार्यालयामध्ये औपचारिक कार्यालयीन कामकाज करण्यात आलं. मला वर्ग पाचवीचा कार्यभार देण्यात आला. आपसी बदली करून याठिकाणी मी रुजू झालो होतो . माझ्या बदली गेलेली गुरुजी त्या गुरुजींचाच वर्ग मला देण्यात आला. सर्व औपचारिकता उरकून मी माझ्या खऱ्या आनंदाच्या दिशेने जाण्यास उत्सुक होतो. इतर सहकारी आपापल्या वर्गावर पोहोचले. मी वर्ग पाचवीच्या दिशेने चालू लागलो . वर्गाच्या खिडकीत उभा राहून अनेक मुलं नवीन आलेल्या शिक्षकाविषयी अर्थात माझ्याविषयी चर्चा करत होते .मुलं अगदी डोक्याच्यास केसांपासून तर पायांच्या नखापर्यंत आपल्या गुरुजीला पाहत असतात. माझ्या हातात असलेलं तांब्याचं कड होतं.एका चिमुरडीने माझं वर्णन 'गुंडा गुरुजी' असंच केलं ते आपल्या मैत्रिणींना सांगत होती ,आपल्याला गुंडा गुरुजी आला आहे. आपला मास्तर काळाचं दिसतो,. असेअनेक विशेषण लावून ते माझ्याविषयी चर्चा करत होते .आपले पहिली गुरुजीच किती छान होते, अशी रंगात आलेली चर्चा आणि माझा अचानक प्रवेश. त्यांच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला.

वर्गात गुरुजी प्रवेश करताच ज्या पद्धतीने मुलांनी स्वागत करायला हवं असं काही झालंच नाही. एक गुरुजी म्हणून मी माझ्या डोक्यात रंगवलेल्या नवा वर्ग,

नवीन शाळेच्या कल्पना गळून पडल्या .मुलांनी कसल्याही प्रकारचा स्वागत केलं नाही .मुलं माझ्याकडे पहायला पण तयार नव्हते. मला वाटलं मी नवीन असल्यामुळे असं वागत असतील. मी संवादाचा एक सूर निर्माण करण्याचा प्रयत्न करत होतो पण मुलांचीही मनस्थिती पाहता काय करावं समजेनासं झालं.मी मुलांच्या हजेरीकडे वळलो .हजेरी घेतली नंतर एकेकाचा परिचय घेऊ लागलो परंतु परिचय देतानाही मुलांच्या चेहऱ्यावरील भाव मला काही वेगळेच सांगून जात होते.मी सहज गप्पा गोष्टी घ्याव्यात म्हणून विषय देऊ लागलो परंतु मुलांचा कुठलाही प्रतिसाद मिळत नव्हता. क्षणभर मी गंभीर झालो.या लेकरांनी माझ्यातल्या शिक्षकाला आव्हान दिलं होतं . खरंतर ही आयुष्यातील पहिलीच घटना की जिथे लेकरांनी मला नाकारलं होतं .कुठल्याही विचारलेल्या प्रश्नांवर तेवढ्यापुरतंच उत्तर देऊन मुलं बसायची .खरतर मुलांच्या खळाळत्या जीवनातून जिवंत शब्द बाहेर यायला हवे. असा वाटणारा मी पण आज एका वेगळ्या परिस्थितीवर येऊन पोहोचलो होतो. क्षणभर विचार केला ही सर्व मुलं बंजारा भाषिक आहेत यांना माझी भाषा समजत नसावी . मुलं ज्या मातीतून जन्मली त्याच मातीतले शब्द असावेत त्यांना त्याची ओळख असावी असं वाटलं. मुलांना माझी भाषा समजते का असाही प्रश्न विचारला परंतु मुलांनी न बोलण्याचा निर्णय घेतला होता की काय असंच वाटू लागलं. मुलांची नेमकी समस्या काय आहे हे कळेना. मी मुख्याध्यापक कार्यालयाकडे येऊन बसलो. आणि क्षणभर आत्मचिंतन करू लागलो. आपलं काही चुकलं तर नाही ना .नेमकं मुलं आपल्याशी असं का वागतात. याचा विचार करू लागलो. इतर गुरुजी लोकांशी या विषयावर चर्चा करणं मला संयुक्तिक वाटलं नाही.

प्रत्येक शिक्षकात एका आईच मन दडलेलं असतं .प्रत्येक आईत एक गुरु असतो.मुलांच्या या कृतीन मी अस्वस्थ झालो होतो.शाळेतील पहिला दिवस आणि मुलांची ही कृती मला रात्रभर झोप न येऊ देणारी होती. दुसरा दिवस उजाडला आणि आज मुलांना बोलतं कसं करायचं? आज त्यांच्या समस्या जाणून घ्यायच्या असा विचार करून शाळेत पोचलो. परिपाठ संपल्यानंतर वर्गात आलो .वर्गात आल्याबरोबर मुलांनी कालचाच पाडा गिरवायला सुरुवात केला. मुलं जेव्हा शाळेबाहेरचं जग पाहण्यासाठी बाहेर पडतात तेव्हा ती चैतन्याने नुसती फुललेली असतात हा विचार करून मी मुलांना वर्गाच्या बाहेर शाळेच्या पटांगणात आणलं आणि मुक्त चर्चा करायला लागलो .मागील त्यांच्या गुरुजींविषयी सांगायला त्यांना प्रवृत्त केलं .त्यावेळी हळूहळू मुलं बोलती होऊ लागली. त्यांना ज्या गुरुजींनी वर्ग पहिलीपासून ते चौथ्या वर्गापर्यंत शिकवलं त्या गुरुजी विषयी भरभरून बोलू लागली .त्यांचे बदलून गेलेले गुरुजी कसे होते ,ते त्यांच्याशी किती छान वागत होते, त्यांना काय आवडत होतं ,ते कधी रागवायचे आणि ती गेल्यानंतर नेमकं काय घडलं या विषयावर ही सर्व चिमुकले बोलू लागली हा सर्व संवाद ऐकून लेकरांच्या वागण्याचं कारण समजलं. मुलांच्या बोलण्याचा रोख अगदी माझ्याच दिशेने होता. त्यापैकी एका धीट मुलीने चक्क माझ्यावर आरोप केला की , तुम्ही आलात म्हणून आमचे गुरुजी गेले .तुम्ही आले नसता तर ते गुरुजी आम्हालाच राहिली असते. हे ऐकून मी थक्क झालोत्या चिमुकल्या मुलीचं हे बोलणं तिच्या भावविश्वाच खरं दर्शन होतं .मुलांच्या खळाळत्या भाव विश्वातला तळ शोधणारा मी गुरुजी .आज या लेकरांच्या भावना पाहून भावविभोर झालो. नेहा नावाच्या मुलीने जे आपल्या गुरुजीविषयी विधान वापरली, आपल्या जुन्या गुरुजींविषयीची भावना व्यक्त केली ते ऐकून खरं तर मी खूप आनंदित झालो . दुसऱ्या बाजूला खूप मोठं आव्हान माझ्या समोर उभा आहे याचीही प्रचिती येऊन गेली. कोणत्याही जीवाला माया दिली ,प्रेम दिलं तर ते आपुलकीचं नातं जपलं जातं, फुललं व फुलवलं जातं, बहरून येतं.

हे अगदी खरं वर्ग पहिलीत परिचित झालेली लेकरं वर्ग चौथीपर्यंत एका गुरुजीसोबत शिक्षणाच्या आनंददायी वाटेवरील सुहृदयी प्रवासी होते. त्यांच्या

प्रवासातील त्यांचा प्रमुख बदलून त्या ठिकाणी दुसरा प्रमुख आला होता. त्यांचा सुरात सूर मिसळला यासाठी काही दिवस तर नक्कीच जातील हे या लेकरांना कसं कळणार ? मात्र मागील अनेक वर्षांच्या अनुभवावरून माझ्या लक्षात आलं होतं .मुलांबरोबर राहव कसं आणि त्यांच्याबरोबर काम करावं कसं .हे ज्या शिक्षकाला कळलं त्यांन मुलांना जिंकलं हे मी चांगलं जाणून होतो आणि या मुलांच्या मनोभावना लक्षात घेऊन नेमकी या मुलांच्या समस्या समजून घेऊन मी पुढील अतिशय नाजूक वळणावर पोहोचलो होतो .लेकरांच्या मनात आपले स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी मला करावी लागणारी धडपड ही माझ्यासाठी खूप मोठं आव्हान होतं परंतु माझ्या बदली बदलून गेलेल्या गुरुजीविषयी या लेकरांच्या मनात असलेलं अपार प्रेम आणि त्यांनी दिलेली शिकवण, त्यांनी दिलेलं प्रेम ,लेकरं मनात साठवून होते आणि नवीन गुरुजींना स्वीकारण्याची त्यांची असमर्थताच त्या गुरुजींविषयीच प्रेम मुलांच्या कृतीतून दिसत होतं.....

नवीन शाळा ,नवीन मुलं आणि या मुलांमध्ये गुरुजींवर प्रेम करण्याची पद्धत मनाला खूप भावून गेली.अशा प्रेम करणाऱ्या मुलांच्यामध्ये मी येऊन पोचलोय याची जाणीव झाली .मनोमन खूप आनंदित झालो..आणि माझ्या बालपणातील 'आनंदाची डहाळी' मला पुन्हा एकदा आठवून गेली .मला असे प्रेम करणारे गुरुजी मिळावेत याची इच्छा होती परंतु आज असे प्रेम करणारे गुरुजीही मुलांवर आहेत आणि मुलं ही अशा गुरुजींवर प्रेम करतात याचं चित्र प्रत्यक्ष पाहायला मिळालं आणि अशा प्रेम करणाऱ्या मुलांच्या मध्ये येऊन मी पोहोचलो याचा मला खूप खूप अभिमान वाटू लागला.

# सेकंदात पाढे...!

साधारणपणे सर्वांचेच १० पर्यंतचे पाढे पाठ असतात. काहीजणांचेच २० पर्यंतचे पाढे पाठ असतात. परंतु मित्रहो आपल्याला ११ ते ९९ पर्यंतचा कोणताही पाठा २०-३० सेकंदात तयार करता आला तर किती मज्जा येईल हो ना, चला तर मग आज आपण सेकंदात पाढे कसे तयार करता येतात. ते शिकूया...

समजा आपल्याला ४८ चा पाढा तयार करायचा आहे. त्यासाठी **कृती क्रं.१ -** जो पाढा तयार करायचा आहे. त्या पाढयाच्या संख्येतील एकक स्थानाच्या अंकचा पाढा ८ चा पाढा लिहिल्याप्रमाणे लिहावा लागेल. म्हणजेच ८ दुणे १६ होतात. आपल्या १६ हा अंक एकक दशकाची बदल करुन ६१ असा लिहावा लागेल. ८ त्रिक २४ होतात. २४ हा अंक ४२ असा लिहावा लागेल. याप्रमाणे जो पाढा तयार कराचा आहे. त्या पाढयातील एकक स्थानाच्या अंकाचा पाढा ८ चा पाढा लिहिल्याप्रमाणे लिहा.

**कृती क्रं.२-** ४८ चा पाढा तयार करायचा म्हणून आपण ८ चा पाढा एकक-दशकची बदल करुन लिहिला व त्यातील एकक स्थानचे अंक गोल केले. ४ चा पाढा म्हणायचा व त्यात गोल केलेले अंक मिळवायचे. अ) ४ दुणे ८ होतात आणि त्यात बाजूचा गोल केलेला अंक १ मिळवला म्हणून त्या ठिकाणी ९ लिहिले. ब) ४ त्रिक १२ होतात. त्या १२ मध्ये गोल केलेला अंक २ मिळवला १४ झाले. म्हणून आपण १४ लिहिले. याप्रमाणे बाजूच्या गोलातील अंक ४ च्या पाढयात मिळवत गेल्यास. ४८ चा पाढा तयार होतो. आहे ना सोपे... चला तर मग बनवा ११ ते ९९ पर्यंतचे पाढे अगदी सेकंदात.

**राजेश वासुदेव कोगदे (शिक्षक)**
जि.प.प्राथमिक शाळा
हिंगणा ता.खामगांव जि.खामगांव
९६५७१५०९६३

आम्ही आहोतच वेगळे...



# इकिडना!

**डॉ.नंदा हरम**
विज्ञान प्रसारक,पुणे
९३७२९१०३०६

आई : महेश, अरे किती वेळ झाला तुला कॉम्प्युटरवर बसून? एवढं कसलं काम चाललंय?

महेश : आई, मी तुला सांगणारच होतो. गेल्या वेळी तू ऑलिंपिकच्या शुभंकर चिन्हातील सीडची म्हणजे प्लॅटिपसची माहिती सांगितलीस.

आई : हो... मग त्याचा काय संबंध माझ्या प्रश्नाशी...

महेश : आई, अग त्या चिन्हातला मिली आहे ना...

आई : हो... म्हणजे इकिडना... त्याचं काय?

महेश : अग, तो मला खूप इंटरेस्टिंग वाटला. मी त्याची सगळी माहिती गोळा केली आहे. मी येत्या आठवडयात सायन्स क्लबमध्ये ती माहिती सांगणार आहे.

आई : व्वा, फारच छान! ऑल दी बेस्ट !

महेश : धन्यवाद, आई! पण नुसत्या शुभेच्छा नकोत! मला तुझी मदत हवी आहे. अपण चर्चा करुया का ?म्हणजे माझी चांगली उजाळणी होईल. सगळे मुद्दे स्पष्ट होती.

आई : अरेच्चा! त्याकरिता एवढी परवानगी कशाला? चल, करुया सुरुवात. मला एक सांग, त्याच्या इकिडना या नावाविषयी काही समजलं?

महेश : माझ्या मनातल्या पहिल्या प्रश्नालाच तू हात घातलास सांग ना तू...

आई : महेश, इकिडना हे नाव ग्रीक पौराणिक कथेतील इकिडना, ज्याचं अर्ध शरीर स्त्रीचं आणि अर्ध सापाचं, त्यावरुन प्रचलित झालं.

महेश : मग बरोबर... साम्य आहे खरं! इकिडना या प्राण्यात सस्तन आणि सरपटणारे प्राणी या दोघांचे गुणधर्म असतात.

आई : इकिडनाची विशेषता काय, महेश?

महेश : आई, इकिडनाच्या चार जाती प्लॅटिपसप्रमाणेच सस्तन प्राणी असून अंडी घालतात. या सर्वांचा मोनोट्रीमॅटो गणात समावेश होतो. मनोट्रीमॅटोचा काही अर्थ आहे का?

आई : महेश, मोनोट्रीमॅटो हा सुध्दा ग्रीक शब्द आहे. मोनोस म्हणजे एक आणि ट्रीमा म्हणजे छिद्र(होल) या प्राण्यांमध्ये फक्त एकच छिद्र असतं, जे उत्सर्जनाकरिता वापरतात तसेच प्रजनन क्रियेकरिताही वापरतात.


महेश : ओ...! आई, वैज्ञानिक संज्ञा अशा असतात की त्यांचा अर्थ शब्दाची फोड केल्यावर लगेच समजतो, नाही?

आई : हो ना. बरं, मला एक सांग, हे इकिडना आपल्या देशात आढळतात का रे?

महेश : नाही गं... ते ऑस्ट्रेलिया, टास्मनिआ आणि न्यू गिनीमध्ये सर्वत्र आढळतात.

आई : बरं.. त्यांचं जे चित्र माझ्या डोळ्यांसमोर येतंय, त्यावरुन मला वाटतं की ते हेनहॉग आणि पॉरक्युपाइनसारखे दिसतात.

महेश : अगदी खरं आहे तुझं म्हणणं अंगावरच्या केसांमुळे आणि काटयांमुळे साधर्म्य वाटतं खरं पण नक्कीच त्यांच्यात फरक आहे. इकिडनाचा चेहरा अगदी छोटासा आणि डोळे ही बारीक असतात. त्याचं नाक लांब असतं, त्याला काहीवेळा चोचही म्हणतात. ही चोच लांबीला कमी असते किंवा काहींमध्ये मोठी




आकृती क. १ः इकिडना
(अ) छोटी चोच
(ब) लांब चोच

असते.(आकृती क्रं.१ पहा) , थोडक्यात दोन प्रकारचे.

आई : तू म्हणालास डोळे बारीक असतात. मग त्याची दृष्टी कशी असते?

महेश : त्यांची दृष्टी क्षीण असते. पण वास आणि श्रवण शक्ती तीव्र असते, ज्यामुळे ते टिकाव धरतात.

आई मघाशी त्यांच्या अंगावरच्या केसांविषयी आणि काटयांविषयी तू काहीतरी सांगत होतास ना?

महेश : छोटी चोच असलेला इकिडना गडद रंगाचा असून अंगावर लव असते. पाठीवर आणि बाजूला असलेल्या काटयांमुळे तो पूर्णपणे झाकलाजातो. हे काटे पोकळ व फारसे टोकदार नसतात. (आकृती क्रं.२ पहा)

लांब चोचीच्या इकिडनाच्या अंगावर लव



आकृती क. २ः इकिडनाच्या शरीरावरचे काटे

त्यामानाने कमी असते आणि काटे सुस्पषट असतात. हे काटे साधारण २ इंच लांबीचे असतात.

आई : महेश, त्यांचे मागचे आणि पुढचे पाय सारखे नसतात ना?

महेश : हो ना, कामाच्या प्रमाणे त्यांची रचना असते. पुढचे पाय आखुड पण मजबूत असतात. त्यावरच्या नख्या टोकदार असतात. या पुढच्या पायांच्या सहायाने जमीन चांगली उकरता येते, तसेच वाळवींच्या वसाहती त्यांना तोडता येतात. मागचे पाय मागच्या बाजूला वळलेले असतात आणि त्याच्या बोटावरची नखी जास्त लांबीची असते

(आकृती क्रं.३ पहा)



आकृती क्र. ३ः इकिडना

आई : ते कशाकरिता ?

महेश : अग... त्याच्या काटयांमध्ये अडकलेली घाण, किडे, काढून टाकण्याकरिता, जणुकाही कंगण्यासारखा उपयोग होतो.

आई : महेश, मला निसर्गाचं नेहमीच कौतुक वाटतं. प्रत्येक सजीवात उपयोगी पडतील, असे बदल झालेले असतात, नाही ?

महेश :तूच म्हणाली हेतीस ना की फक्त सशक्त संजीवच टिकून राहतात, निसर्ग नियमच आहे तो!

आई : आहेच मुळी! बरं, त्या चोचीचं काही वैशिष्ट्य आहे का ?

महेश : तोंडाचं आणि नाकाचं काम ही चोच, त्याला आपण तुंड म्हणू या, करतं. गेल्यावेळी तू सांगितलंस ना, प्लॅटिपसच्या तुंडावर ४०,००० विद्युतग्रहण केंद्र असतात. इकिडनाच्या तुंडावरही असतात, पण संख्या कमी असते. इकिडनाच्या लांब व छोटया तुंडावर अनुक्रमे २००० आणि ४०० पर्यंत विद्युतग्रहण केंद्र असता.

आई : तुझ्या चित्रामध्ये त्यांचे कान दिसत नाही ते ?

महेश : त्यांच्या कानाला पाळया नसतात, तर डोक्याच्याबाजूला भागावर खाचा असतात. काटयांमुळे त्या ही झाकल्या जातात, त्यामुळे दिसत नाहीत.

आई : हे इकिडना मुंग्या, वाळवी खातात का रे ?

महेश : छोटे तुंडाच्या इकिडना मुख्य अन्न मुंग्या, वाळवी आहे तर लांब तुंडाचे इकिडना किडे, गांडूळ, अळया खातात. त्याचं तोडं छोटर्स असते. त्यांना दात नसतात. पण त्यांची जीभ चिकट आणि चांगलीच लांब म्हणजे ६ इंचाची असते. ती ते तुंडातून बाहेर काढतात आणि पटपट किडे, मुंग्या त्याच्या सहाय्याने गोळा करतात. जीभेच्या खाली आणि तोंडात वरच्या भागावर कठीण असा पॅडसारखा भाग असतो,ज्याच्या सहाय्याने अन्नाचं चर्वण करुन मग ते गिळलं जातं

आई : शाब्बास! अगदी बारकाईन माहिती गोळा केलीस. पण महेश सस्तन प्राण्यांचं एक वैशिष्टय याच्यात आढळत नाहीत. आठवतंय का बघ ?

महेश : अं... आठवलं इकिडनाच्या शरीराचं तापमान इतर सस्तन प्राण्यांप्रमाणे ३७° सेल्सिअस नसून ३३° सेल्सिअस असतं. इकिडनाला घाम येत नाही, त्यामुळे उष्णता वाढली की त्याची पंचाईत होते. म्हणूनच उन्हाळयाच्या दिवसांत तो दिवसा फार हालचाली करत नाही, शक्यतो टाळतो.

आई : आणि, हिवाळ्यात... ?

महेश : तो शीतकाल समाधी घेतो. चयापचय क्रिया अगदी कमी करुन ऊर्जेची बचत करतो. तापमान वाढलं की तो त्यातून बाहेर पडतो, त्यानंतर त्यांचा प्रजननचा काळ असतो.

आई : नर मादीपेक्षा मोठा असतो. हो ना ?

महेश : हो... साधारणपणे नर मादीपेक्षा २४% मोठा असतो. पूर्ण वाढलेल्या मादीचं वजन ४.५ कि.ग्रॅ. तर नराचं ६ कि.ग्रॅ. असतं.

आई : इकिडनाची मादी किती अंडी घालते एकावेळी ?

महेश : ती एकावेळी एकच अंडं घालते. समागम झाल्यानंतर २२ दिवसांनी ती हे मऊ कवच असलेलं, चामडयासारखं अंड घालते ते तिच्या पिशवीत जमा होतं.

आई : हे अंड केवढ असतं ?

महेश : अगदी छोटं, साधारण १.४ ते २ ग्रॅम वजन आणि १.४ सेंमी लांबीचं असतं. १० दिवसांनंतर अंडयाचं कवच फोडून छोटंसं पिल्लू बाहेर येतं, त्याला पगल म्हणतात. आणखी एक वैशिष्टय म्णहजे इकिडना सस्तन प्राणी असूनही, मादीला स्तनाग्रं नसतात. पण पगल मादीच्या अंगावरील दूध येणाऱ्या जागेतील छिद्रांमधून दूध ओढून घेतं. हे पगल पिशवीमध्ये ४५ ते ५५ दिवस असतं. या दरम्यान पगलच्या अंगावर काटे वाढायला सुरुवात होते.

आई : आता ते पिशवीतून बाहेर येतं, बरोबर ?

महेश : अगदी बरोबर !त्याची आई छोटासा खड्डा खणते, त्यात हे पगल विसावते.

आई : पण त्याच्या खाण्याचं काय ?

महेश : प्रत्येक पाचव्या दिवशी येऊन आई त्याला दूध पाजते. सात महिन्यानंतर हे सारं थांबतं. साधारण वर्ष होईपर्यंत ते आई जवळ रहातं. मग ते तिला सोडून जातं.

आई : महेश, तू सगळ्या गोष्टी सांगितल्यास, पण एक राहिली महत्वाची... आठवत्येस का ?

महेश : थांब हं, विचार करतो. अरे हो... संरक्षण. सांगतो.. इकिडना हळूहळू चालतो. त्याला मुख्य धोका असतो तो कुत्री, मांजरी आणि कोल्ह्याकडून. त्याच्याकडे तीन पर्याय असतात-पळून जाणं, खणणं किंवा शरीराचा गोळा बनवणं.

आई : म्हणजे नेमकं काय ?

महेश : त्याची खणण्याची क्षमता सर्वोत्तम आहे. असं म्हणतात की आपण फावडयाने ज्या गतीने जमीन उकरु, त्याच गतीने तो त्याच्या पायाच्या सहाय्याने जमीन उकरु शकतो. तो चांगला खड्डा खणतो आणि त्यात लपतो. बाहेर काय दिसतं, तर थोडेफार काटे ते धरुन त्याला बाहेर काढणं, भक्षकांना जवळ-जवळ अशक्य असतं.

आई : पुढचं मी सांगते. तो आपलं तोंड आणि पाय आत खुपसून शरीराचा जणु चेंडू तयार करतो.(आकृती क्रं.४ पहा)



आकृती क्र. ४: इकिडनाचे संरक्षण

एकतर शरीराचं घट्ट मुटकुंळ करतो आणि बाहेर दिसतात ते फक्त काटे.

महेश : आई, सगळी माहिती सांगितली ना मी ?

आई : छान सांगितलीस सायन्स क्लबमध्ये न घाबरता सांग सारं, ऑल दी बेस्ट

महेश : आणखी एक, सहज गंमत म्हणून ऑस्ट्रेलियामध्ये प्लॅटिपसप्रमाणे इकिडनाला ही महत्व आहे. पाच सेंटच्या नाख्यावर तसेच पोस्टाच्या तिकीटांवर विराजमान होण्याचा त्याल मान मिळालाय(आकृती क्र.५ पहा)




क्र. ५: इकिडना



आई : अगदी खरं ! चला बाळा, झाली का तुझ्या मनासारखी चर्चा ?

महेश : हो, अगदी छान झाली मी आता आत्मविश्वासाने बोलेन माझ्या सायन्स क्लबमध्ये... थॅंक यू सो मच, आई

animals. sandiegozoo.org / animals/echidna

लेखातील चित्रे आंतरजालातून साभार उपलब्ध

## उंबरठा

उंबरठा हा केवळ
घराच्या दरवाजाचाच नसतो
कधीकधी तो पारंपरिक
बुरसटलेल्या विचारांचाही असतो.

उंबरठा ओलांडला जिजाऊंनी
म्हणून घडले छत्रपती शिवाजी
ज्यांनी स्वराज्य स्थापन करण्या
लावली स्वतः च्या जीवाची बाजी

लक्ष्मीबाईंनी ओलांडला उंबरठा
म्हणून झाशीची राणी झाल्या
ब्रिटिशांशी धैर्याने लढून
अमरत्वाची कहाणी झाल्या

किरण बेदींनी ओलांडला उंबरठा
म्हणून एक स्त्री मर्दानी झाली
पहिली आय.पी.एस. बनून
सामान्यांच्या रक्षणा धाऊन आली

ओलांडला उंबरठा बुरसटलेल्या विचारांचा,
म्हणूनच घडल्या इंदिरा,डॉ आनंदी ,सावित्रीबाई.
त्यांच्या अफाट उत्तुंग कर्तृत्वाची,
वाटे अवघ्या जगाला नवलाई.

**-सोनाली भगवान गाडीलोहार,**
न.पा.शाळा क्रं.७ शिरपूर,जि.धुळे
९०४९९४८९८४

## भाळी सूर्य वसू दे

वस्ती वस्तीतून
लालेलाल झालेल्या
काळ्या मातीला
विचारा.. म्हणावं
माय.....
हा लाल रक्ताचा
काळा इतिहास
कुठवर पोटात
घेवून धगधगत
तू राहणार आहेस...?
तुझ्या पाखरांना
पंख दे.
आभाळा एवढे
बख दे.
शेतीमाती पिकू दे
बळीचं राज्य येवू दे.
मातीवरती प्रेम करतो
बाप माझा.
त्याच्या ओठी
थोडे हसू दे.
घामाचे मोल त्याच्या
सार्या जगाला
कळू दे.
उद्याचा सूर्य
त्याच्या भाळी
वसू दे.

**- संजय घाडगे,लातूर**
९८२२९११९८५,

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No.

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा १००० ते २००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट - शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com


Reg No. MAHMAR2015/67226

Postal Registration No.DHL/557/2018-20










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ५०० रूपये   द्विवार्षिक वर्गणी - १००० रूपये   त्रैवार्षिक वर्गणी-१५०० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--512700301000129 Ifsc-VIJB0005127

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ................................................
................................................
................................................

Pragati Arts Shirpur 8421356261